2E

भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# वजन व माप मानक (ब्रजावणी) अधिनियम, १९८५

(सन १९८५ चा अधिनियम क्रमांक ५४)

[ २ सप्टेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# The Standards of Weights and Measures (Enforcement) Act, 1985

## (Act No. 54 of 1985)

[ As in force on the 2nd September 1991 ]

संचालक, मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या
वतीने मुद्रित व प्रकाशित केले
१९९४

[ किमत : रुपये ४.८० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ सप्टेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला वजन व माप मानक (बजावणी) अधिनियम, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ४, अंक ३, दिनांक ११ नोव्हेंबर १९९३ यात पृष्ठ १८४ ते २०६ मध्ये, प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ११ नोव्हेंबर १९९३.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Standards of Weights and Measures (Enforcement) Act, 1985 as on the 2nd September 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 4, dated 11th November 1993 on pages 184 to 206.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 11th November 1993.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# वजन व माप मानक (बजावणी) अधिनियम, १९८५

(१९८५ चा अधिनियम क्रमांक ५४)

[४ सप्टेंबर १९८५]


कलमांचा क्रम

कलमे

प्रकरण एक

प्रारंभिक

१ संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२ आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य याला अधिनियम लागू नसणे.
३ व्याख्या.
४ या अधिनियमाचे उपबंध, मानक अधिनियमाच्या उपबंधाव्यतिरिक्त, अन्य कोणत्याही विधीच्या उपबंधावर अधिभावी असणे.

प्रकरण दोन

नियंत्रक, निरीक्षक आणि इतर अधिकारी यांची नियुक्ती

५ नियंत्रक, निरीक्षक आणि इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग यांची नियुक्ती.
६ निरीक्षकाला वजने किंवा मापे समायोजित करण्यास प्राधिकृत करण्याची शक्ती.
७ नियंत्रक आणि या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी हे लोकसेवक असणे.
८ सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

प्रकरण तीन

वजन व माप मानक या संबंधातील सर्वसाधारण उपबंध

९ वजन व माप मानक याव्यतिरिक्त इतर वजन व माप यांच्या उपयोगास मनाई.
१० विवक्षित प्रकरणी केवळ वजनांचा किंवा केवळ मापांचा उपयोग.
११ वजन किंवा माप मानक यांच्या परिभाषेत असेल ते खेरीजकरून अन्यथा दरपत्रकें, इत्यादींना मनाई.

प्रकरण चार

मानक साधनसामग्रीची अभिरक्षा व पडताळणी

१२ निर्देश मानकांची अभिरक्षा व पडताळणी.
१३ दुय्यम आणि कार्यसाधक मानके बनविणे.
१४ दुय्यम किंवा कार्यसाधक मानकांची पडताळणी, मुद्रा लावणे व अभिरक्षा.
१५ ज्यांच्यावर मुद्रा लावली नाही तरी चालेल अशी दुय्यम किंवा कार्यसाधक मानके.

प्रकरण पाच

वजन व माप यांच्या उपभोगकर्त्यांची नोंदणी

१६ संव्यवहारांसाठी किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी वजन किंवा माप यांचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींनी स्वत:ची नोंदणी करून घेणे.
१७ नोंदणीची कार्यपद्धती.
१८ नोंदणी न केल्याबद्दल शिक्षा.

## प्रकरण सहा

### वजन किंवा माप यांची निर्मिती, दुरुस्ती किंवा विक्री

१९ लायसनशिवाय वजन किंवा माप यांची निर्मिती, दुरुस्ती किंवा विक्री यांस मनाई.
२० लायसन निलंबित करणे व रद्द करणे.
२१ वजन किंवा माप यांची निर्मिती.
२२ मुद्रा न लावलेले वजन किंवा माप यांची विक्री वा त्यांचा उपयोग करण्यास मनाई.
२३ निर्माता इत्यादींनी अभिलेख व नोंदवह्या ठेवणे.

## प्रकरण सात

### वजन किंवा माप यांची पडताळणी व त्यांवर मुद्रा लावणे

२४ वजन किंवा माप यांची पडताळणी व त्यांवर मुद्रा लावणे.
२५ पडताळणी प्रमाणपत्र प्रदर्शित करणे.
२६ यथोचित रीत्या मुद्रा लावलेले वजन किंवा माप यांची विधिग्राह्यता.

## प्रकरण आठ

### निरीक्षण, झडती, जप्ती व समपहरण

२७ निरीक्षण करण्याची शक्ती.
२८ वजन किंवा माप किंवा अभिलेख निरीक्षणासाठी हजर करण्यास फर्माविण्याची निरीक्षकाची शक्ती.
२९ प्रवेश करण्याची व निरीक्षण करण्याची शक्ती.
३० झडती घेण्याची शक्ती.
३१ निरीक्षकाची कोणतेही वजन किंवा माप जप्त करण्याची शक्ती.
३२ समपहरण.

## प्रकरण नऊ

### पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंची राज्यांतर्गत विक्री व वितरण यासंबंधातील उपबंध

३३ मानक अधिनियम आणि त्या अन्वये केलेले नियम यांमधील, पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंच्या संबंधातील उपबंध राज्यांतर्गत, पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंच्या विक्रीस लागू असणे.

## प्रकरण दहा

### कोणत्याही वस्तूंची विक्री—मग अशी विक्री परिमाणाने असो किंवा नगाने असो—आणि वस्तूंच्या राशींनी विक्री या संबंधातील कोणतीही रूढी किंवा परिपाठ यांबाबतचे उपबंध

३४ अतिरिक्त परिमाण देणे आवश्यक ठरवणारी रूढी किंवा परिपाठ समाप्त होणे.
३५ राशींनी विक्री.

## प्रकरण अकरा

### अपराध व शास्ती

३६ अमानक वजन किंवा माप निर्माण करणे, इत्यादींसाठी शास्ती.
३७ मोहोर, इत्यादी नकली तयार करण्याबद्दल शास्ती.
३८ वस्तू, इत्यादींची अमानक वजन किंवा माप याद्वारे विक्री वा पोचवणी याबद्दल शास्ती.
३९ अमानक वजन किंवा माप उपयोगात आणण्याकरिता ठेवण्याबद्दल आणि इतर व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

४० कलम १० च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४१ कलम ११ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४२ कलम १९ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४३ कलम २० च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४४ कलम २१ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४५ कलम २२ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४६ कलम २३ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४७ कलम २४ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४८ कलम २८ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
४९ कलम २९ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
५० कलम ३० व ३१ यांच्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
५१ कलम ३३ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
५२ कलम ३५ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
५३ लायसनमध्ये अनधिकृत फिरवाफिरव करण्याबद्दल शास्ती.
५४ नाकारलेले वजन व माप यांची विक्री पोचवणी करण्याबद्दल शास्ती.
५५ पदाधिकारी म्हणून तोतयेगिरीबद्दल शास्ती.
५६ खोटी माहिती देण्याबद्दल किंवा खोटे अभिलेख किंवा नोंदवह्या ठेवण्याबद्दल शास्ती.
५७ कायद्यांचे व्यतिक्रमण करून बुद्धिपुरस्सर पडताळणी करणे किंवा माहिती उघड करणे.
५८ त्रासदायक झडती.
५९ ज्यांच्यासाठी स्वतंत्रपणे उपबंध केलेला नाही अशा व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
६० विवक्षित प्रकरणांमध्ये गृहित धरावयाच्या गोष्टी.
६१ नियोक्त्याने अपराधास अपप्रेरणा दिली असे केव्हा मानता येईल.
६२ कंपन्यांनी केलेले अपराध.
६३ अपराधाची दखल.
६४ विवक्षित अपराधांची संक्षिप्त संपरीक्षा.
६५ अपराध आपसात मिटविणे.
६६ भारतीय दंड संहितेचे उपबंध या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधास लागू नसणे.

## प्रकरण बारा

### संकीर्ण

६७ व्यवसायाचे हस्तांतरण किंवा प्रेषण.
६८ लायसने विक्रीयोग्य किंवा हस्तांतरणीय नसणे.
६९ अपिले.
७० फीची आकारणी.
७१ शक्तींचे प्रत्यायोजन.
७२ नियम करण्याची शक्ती.
७३ मानक अधिनियमांचे प्रतिमानांना मान्यता देण्यासंबंधीचे उपबंध केवळ राज्यांतर्गत उपयोग उद्देशित असलेल्या वजनांच्या किंवा मापांच्या प्रतिमानांना लागू करण्याची राज्य शासनाची शक्ती.
७४ विवक्षित प्रकरणांना हा अधिनियम लागू न होणे.
७५ निरसन व व्यावृत्ती.

# वजन व माप मानक (बजावणी) अधिनियम, १९८५

( १९८५ चा अधिनियम क्रमांक ५४ )

[ दिनांक २ सप्टेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान ]

[ ४ सप्टेंबर १९८५ ]

## प्रकरण १ ले

### प्रारंभिक

वजन व माप यांची मानके अधिनियम, १९७६ या द्वारे किंवा अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानक वजन व माप यांच्या बजावणीसाठी आणि तिच्याशी संबंधित व तिला आनुषंगिक असणाऱ्या बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास वजन व माप मानक (बजावणी) अधिनियम, १९८५ असे म्हणता येईल.

(२) संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो एखाद्या राज्यात अंमलात येईल, आणि त्याच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी किंवा खालील निरनिराळ्या बाबतीत निरनिराळे दिनांक नियत करता येतील :—

(क) राज्यातील क्षेत्रे किंवा

(ख) राज्यातील उपक्रमांचे वर्ग, किंवा

(ग) राज्यात निर्माण करण्यात, विकण्यात, वितरित करण्यात, बाजारात विक्रीसाठी आणण्यात किंवा हस्तांतरित करण्यात येणाऱ्या मालाचे वर्ग, किंवा

(घ) राज्यात पुरवण्यात येणाऱ्या सेवांचे वर्ग, किंवा

(ङ) राज्यात निर्माण करण्यात, विकण्यात, वितरित करण्यात, बाजारात विक्रीसाठी आणण्यात हस्तांतरित करण्यात, दुरुस्त करण्यात येणारे किंवा उपयोगात आणले जाणारे वजन व माप यांचे वर्ग, किंवा

(च) राज्यातील वजन व माप यांच्या उपयोगकर्त्यांचे वर्ग, आणि अशा कोणत्याही उपबंधातील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या संबंधातील कोणत्याही निर्देशाचा अर्थ, हा अधिनियम किंवा, प्रकरणपरत्वे, तो उपबंध, ज्या क्षेत्राच्या किंवा व्यक्तीच्या संबंधात हा अधिनियम अंमलात आणण्यात आला आहे त्या क्षेत्रांमध्ये किंवा उपक्रमांचे, मालांचे, सेवांचे असे वर्ग, वजन व माप यांचे वर्ग किंवा वजन व माप यांच्या उपयोगकर्त्यांचे वर्ग यांच्या संबंधात अंमलात येण्याशी आहे असा लावण्यात येईल.

आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य याला अधिनियम लागू नसणे.

२. या अधिनियमातील कोणतीही गोष्ट,—

(क) कोणतेही वजन किंवा माप, किंवा

(ख) वजन, माप किंवा नग यावर विकला जाणारा, पोचवला जाणारा किंवा वितरित केला जाणारा अन्य कोणताही माल यांच्या आंतरराज्यीय व्यापारास किंवा वाणिज्यास लागू होणार नाही.

व्याख्या.

३. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अपर नियंत्रक" यामध्ये, कलम ५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला सहनियंत्रक, उपनियंत्रक व सहायक नियंत्रक यांचा समावेश आहे;

(ख) "अधिकृत मोहोर किंवा मुद्रा" याचा अर्थ, या अधिनियमाच्या उपबंधान्वये व अनुसार लावलेली मोहोर किंवा उमटवलेली मुद्रा असा आहे;

(ग) "नियंत्रक" याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला विधिक मापनशास्त्र नियंत्रक, असा आहे;

(घ) एखाद्या मोहोरेच्या किंवा मुद्रेच्या संबंधात "नकली" याचा अर्थ, अशी एखादी मोहोर किंवा मुद्रा की जी, एखाद्या अधिकृत मोहोरेशी किंवा, प्रकरणपरत्वे, मुद्रेशी सदृश असून अशा सादृश्यामुळे फसवणूक करण्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे फसवणूक केली जाणे संभवनीय आहे, हे माहीत असेल, अशी मोहोर किंवा मुद्रा असा आहे;

स्पष्टीकरण एक.—नकली मोहोर किंवा मुद्रा यांचे अधिकृत मोहोर किंवा मुद्रा यांच्याशी तंतोतंत सादृश्य असण्याची आवश्यकता नाही.

**स्पष्टीकरण दोन.**—ज्यावेळी एखादी व्यक्ती अधिकृत मोहोर किंवा मुद्रा हिच्याशी सादृश्य असलेली नकली मोहोर किंवा मुद्रा बनवून घेईल आणि हे सादृश्य असे असेल की, अशी मोहोर वा मुद्रा यावर भरवसा ठेवल्यास कोणत्याही व्यक्तीची फसवणूक होईल त्यावेळी एतद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत अधिकृत मोहोर किंवा मुद्रा हिच्याशी सादृश्य असलेली अशी मोहोर किंवा मुद्रा बनवून घेणाऱ्या व्यक्तीचा त्या सादृश्याद्वारे फसवणूक करण्याचा हेतू किंवा त्याद्वारे फसवणूक करता येण्याचा संभव आहे, हे तिला माहीत होते, असे गृहित धरले जाईल.

(ङ) "रास" याचा अर्थ ज्यावेळी वजन किंवा माप न करता कोणतीही विक्री करण्याचा उद्देश असतो किंवा जेव्हा विक्री नगांनी परंतु संख्या न मोजता करावयाची असते त्यावेळचे विक्रेय वस्तूचे कोणतेही युनिट, असा आहे;

(च) "निरीक्षक" याचा अर्थ, कलम ५ अन्वये निरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती असा आहे—मग तिला कोणतेही नाव दिलेले असो;

(छ) "टाकसाळ" याचा अर्थ, केंद्र शासनाची टाकसाळ, असा आहे;

(ज) "अधिसूचना" याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना, असा आहे;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये विहित, असा आहे;

(ञ) "संरक्षण" याचा अर्थ, कोणत्याही मनुष्यप्राण्याच्या किंवा प्राण्याच्या कल्याणाचे रक्षण करण्याच्या अथवा कोणतीही वस्तू, वनस्पती किंवा गोष्ट व्यक्तिश: अथवा सामुदायिक रीत्या सुरक्षित ठेवण्याच्या प्रयोजनार्थ, कोणतीही उपाययोजना करणे आवश्यक आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी कोणतेही वजन वा माप यांचा उपयोग किंवा कोणत्याही वजनाच्या वा मापाच्या सहाय्याने मिळविलेला कोणताही वाचनांक, असा आहे ;

(ट) "मानक अधिनियम" याचा अर्थ, वजन व माप मानक अधिनियम, १९७६ (१९७६ चा ६०), असा आहे;

(ठ) "मानक वजन किंवा माप" याचा अर्थ, वजन, माप किंवा नग यांच्या संबंधात मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित मानकांशी जुळणारे वजन, माप किंवा नग असा आहे;

(ड) "राज्य अधिनियम" याचा अर्थ, वजने व मापे यांची मानके अधिनियम, १९५६ (१९५६ चा ८९) अन्वये प्रस्थापित केलेल्या मानकांच्या बजावणीसाठी राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेला अधिनियम, असा आहे;

(ढ) संघराज्य क्षेत्राच्या संबंधात "राज्य शासन" याचा अर्थ, त्या संघराज्य क्षेत्राचे प्रशासन, असा आहे;

(ण) या अधिनियमात उपयोगात आणलेले परंतु व्याख्या न केलेले परंतु मानक अधिनियमात व्याख्या केलेले शब्द व वाक्प्रयोग यांना, त्या अधिनियमात त्यांना अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

*या अधिनियमाचे उपबंध, मानक अधिनियमाच्या उपबंधाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही विधीच्या उपबंधावर अधिभावी असणे.*

४. या अधिनियमाचे उपबंध, हा अधिनियम आणि मानक अधिनियम याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा हा अधिनियम किंवा मानक अधिनियम या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणामक होणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये, त्यांच्याशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरीही, परिणामक होतील.

## प्रकरण दोन

### नियंत्रक, निरीक्षक आणि इतर अधिकारी यांची नियुक्ती

*नियंत्रक, निरीक्षक आणि इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग यांची नियुक्ती.*

५. (१) राज्य शासनाला, अधिसूचनेद्वारे, राज्यासाठी एक विधिक मापनशास्त्र नियंत्रक आणि हा अधिनियम किंवा मानक अधिनियम याद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि सोपवण्यात आलेली कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील तितके अपर, सह, उप किंवा सहायक नियंत्रक, निरीक्षक आणि इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग यांची नियुक्ती करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला, प्रत्येक अपर नियंत्रक, निरीक्षक किंवा इतर अधिकारी, राज्य शासन, यासंबंधात अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करील अशा नियंत्रकाच्या शक्तींचा वापर करील आणि त्याची अशी कार्ये पार पाडील.

(३) नियंत्रकाला, सर्वसाधारण या विशेष आदेशाद्वारे, पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला प्रत्येक अपर नियंत्रक, निरीक्षक किंवा इतर अधिकारी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा जेथे वापर करील आणि त्याच्यावर सोपविण्यात आलेली कर्तव्ये जेथे पार पाडील त्या स्थानिक सीमा निश्चित करता येतील.

(४) या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला प्रत्येक अपर नियंत्रक, निरीक्षक आणि इतर अधिकारी, नियंत्रकाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन आणि नियंत्रण याखाली आपल्या शक्तींचा वापर करील आणि आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडील आणि त्या शक्ती व कर्तव्ये, ही जणूकाही या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्याच्याकडे—प्रत्यक्षपणे प्राधिकाराद्वारे नव्हे—प्रदान करण्यात किंवा सोपविण्यात आल्याप्रमाणे तो त्याच पद्धतीने आणि त्याच परिणामकपणे, त्यांचा वापर करील किंवा पार पाडील.

(५) नियंत्रक आणि प्रत्येक अपर नियंत्रक आणि या अधिनियमाद्वारे वा तदन्वये प्राधिकृत करण्यात आलेला इतर अधिकारी त्याला,—

(क) निरीक्षकाची सर्व कर्तव्ये किंवा त्यापैकी कोणतेही काम पार पाडता येईल, आणि

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश याद्वारे निरीक्षकाला प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तींचा किंवा त्यापैकी कोणत्याही शक्तीचा वापर करता येईल.

**निरीक्षकाला, वजन किंवा माप समायोजित करण्यास प्राधिकृत करण्याची शक्ती.**

६. नियंत्रकाच्या मते तसे करणे आवश्यक असेल तेव्हा, त्याला, निरीक्षकाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याला, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील कोणत्याही क्षेत्रात कोणतेही वजन किंवा माप समायोजित करण्यास, लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करता येईल.

**नियंत्रक आणि या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी हे लोकसेवक असणे.**

७. (क) नियंत्रक आणि प्रत्येक अपर नियंत्रक व प्रत्येक निरीक्षक, आणि

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणतेही कर्तव्य पार पाडण्यात प्राधिकृत करण्यात आलेला प्रत्येक इतर अधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.**

८. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणतीही शक्ती वापरण्यास किंवा कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास प्राधिकृत करण्यात आलेला नियंत्रक, कोणताही अपर नियंत्रक, निरीक्षक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती हिच्याविरुद्ध या अधिनियमान्वये किंवा मानक अधिनियमान्वये किंवा पूर्वोक्तांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेला कोणताही नियम किंवा आदेश याखाली सद्भावपूर्वक केलेल्या वा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात कोणताही दावा, खटला किंवा इतर विधिक कार्यवाही करता येणार नाही.

## प्रकरण तीन

### वजन व माप मानक या संबंधातील सर्वसाधारण उपबंध

**वजन व माप मानक याव्यतिरिक्त इतर वजन व माप यांच्या उपयोगास मनाई.**

९. (१) कोणतीही रुढी, परिपाठ किंवा कोणत्याही स्वरूपाची पद्धत असली तरीही, वजन वा माप मानकाव्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन वा माप उपयोगात आणले जाणार नाही किंवा वजन करण्यासाठी किंवा मापण्यासाठी असे वजन किंवा माप कोणत्याही वजनाऐवजी किंवा मापाऐवजी उपयोगात आणण्याचा उद्देश आहे किंवा उपयोगात आणले जाण्याची शक्यता आहे, असे दर्शविणाऱ्या स्थितीत कोणत्याही जागेत ठेवले जाणार नाही.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर आणि तेव्हापासून, वजन वा माप मानकाव्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन, माप किंवा नग याचा उपयोग अन्य कोणताही व्यापार, वाणिज्य, उत्पादन वा संरक्षण यांच्या संबंधातील कोणतीही संविदा किंवा अन्य करार यामध्ये केला जाणार नाही किंवा त्याचा आधार म्हणून असणार नाही.

(३) पोटकलम (२) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करणारी कोणतीही संविदा किंवा करार शून्य होईल.

**विवक्षित प्रकरणी केवळ वजनांचा किंवा केवळ मापांचा उपयोग.**

१०. (१) राज्य शासनाला, यासंबंधात केलेल्या नियमांद्वारे निदेश देता येईल की, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेला माल, सेवा किंवा उपक्रम किंवा उपयोगकर्ते यांच्या वर्गाच्या बाबतीत, विनिर्दिष्ट केलेले वजन, माप किंवा नग याव्यतिरिक्त,—

(क) कोणताही संव्यवहार, व्यवहार किंवा संविदा केली जाणार नाही किंवा होणार नाही, अथवा

(ख) कोणतेही औद्योगिक उत्पादन हाती घेतले जाणार नाही, अथवा

(ग) संरक्षणासाठी उपयोग केला जाणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली तयार केलेला कोणताही नियम त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात, अशा पुढील दिनांकापासून आणि अशा शर्तींच्या, कोणत्याही असल्यास, अधीनतेने परिणामक होईल.

वजन किंवा माप मानक यांच्या परिभाषेत असेल ते खेरीजकरून अन्यथा दरपत्रके इत्यादींना मनाई.

११. मानक अधिनियमान्वये एखाद्या व्यक्तीला तसे करण्यास परवानगी दिली असेल ते खेरीजकरून, कोणतीही व्यक्ती, विकलेल्या, हस्तांतरित केलेल्या किंवा वितरित केलेल्या किंवा पोचविलेल्या कोणत्याही मालाच्या किंवा वस्तूंच्या संबंधात अथवा देण्यात आलेल्या कोणत्याही सेवेसंबंधात वजन किंवा माप मानकानुसार असेल त्याखेरीज—

(क) कोणतीही किंमत किंवा आकार मौखिकरीत्या किंवा अन्यथा उद्धृत करणार नाही किंवा जाहीर करणार नाही, अथवा

(ख) कोणतीही किंमतसूची, बीजक, रोखीचे टिपण किंवा इतर दस्तऐवज काढणार किंवा प्रदर्शित करणार नाही, अथवा

(ग) कोणतीही जाहिरात, भित्तिपत्रक किंवा इतर दस्तऐवज यामध्ये कोणत्याही वजनाचा वा मापाचा उल्लेख करणार नाही, अथवा

(घ) कोणत्याही पुडक्यामधील वस्तूंचे निव्वळ वजन, माप किंवा नग प्रत्यक्ष त्या पुडक्यावर किंवा कोणतेही लेबल, खोका किंवा इतर वस्तू यावर निर्देशित करणार नाही, अथवा

(ङ) कोणताही संव्यवहार, औद्योगिक उत्पादन किंवा संरक्षण यांच्या संबंधात कोणतेही परिमाण किंवा मिती व्यक्त करणार नाही.

## प्रकरण चार

### मानक साधनसामग्रीची अभिरक्षा व पडताळणी

निदेश मानकांची अभिरक्षा व पडताळणी.

१२. प्रत्येक निर्देश मानक विहित करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा अभिरक्षेत ठेवण्यात येईल आणि असे कोणतेही निर्देश मानक हे मानक अधिनियमान्वये केलेल्या नियमांनुसार त्याची पडताळणी केली असल्याशिवाय, ते अधिप्रमाणित केले असल्याशिवाय, आणि त्याचे परिरक्षण केले असल्याशिवाय, निर्देश मानक असल्याचे मानले जाणार नाही किंवा निर्देश मानक म्हणून ते उपयोगात आणले जाणार नाही.

दुय्यम आणि कार्यसाधक मानके बनविणे.

१३. राज्य शासनाला, मुंबई येथील टाकसाळीच्या मापनशास्त्र प्रशाखेकडून, दुय्यम मानकांचे किंवा कार्यसाधक मानकांचे, त्याला आवश्यक वाटतील तितके संच बनवून घेता येतील :

परंतु, कोणतेही दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक बनविण्यास आपण असमर्थ आहोत असे टाकसाळीकडून राज्य शासनाला लेखी कळविण्यात येईल तेव्हा, राज्य शासनाकडून यासंबंधात केंद्र शासनाकडे निर्देशाद्वारे विचारणा करण्यात आल्यानंतर केंद्र शासन याबाबतीत अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा संघटनेकडून त्या शासनाला असे दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक बनवून घेता येईल.

दुय्यम किंवा कार्यसाधक मानकांची पडताळणी, मुद्रा लावणे व अभिरक्षा.

१४. (१) कलम १३ मध्ये निर्देशिलेले प्रत्येक दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक, हे मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित केलेल्या मानकानुरूप असेल, आणि—

(क) दुय्यम मानकाच्या बाबतीत, समुचित निर्देश मानकासमवेत, जेथे निर्देश मानके ठेवण्यात येत असतील अशा ठिकाणांपैकी कोणत्याही एका ठिकाणी ;

(ख) कार्यसाधक मानकाच्या बाबतीत, समुचित दुय्यम मानकासमवेत जिथे दुय्यम मानके ठेवण्यात येत असतील अशा ठिकाणांपैकी कोणत्याही एका ठिकाणी ;

मानक अधिनियमाद्वारे किंवा अन्वये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा नियत कालांतरांनी त्याची पडताळणी करण्यात येईल आणि अशा पडताळणीनंतर ते त्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानकानुरूप असल्याचे आढळल्यास त्यावर मुद्रा लावण्यात येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही दुय्यम किंवा कार्यसाधक मानकावर मुद्रा लावण्यात आली असेल तेव्हा, अशा वजनावर किंवा मापावर ज्या दिनांकास मुद्रा लावण्यात आली तो दिनांक दर्शविणारे प्रमाणपत्र स्वतंत्रपणे देण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेली प्रत्येक पडताळणी व मुद्रा लावणे हे मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा व्यक्तीकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून केले जाईल.

(४) पोटकलम (१) आणि पोटकलम (३) च्या उपबंधानुसार पडताळणी न केलेले व मुद्रा न लावलेले दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक, दुय्यम मानक किंवा प्रकरणपरत्वे, कार्यसाधक मानक

असल्याचे मानले जाणार नाही. आणि ते कोणत्याही कार्यसाधक मानकाच्या पडताळणीसाठी किंवा प्रकरणपरत्वे, कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या पडताळणीसाठी वापरले जाणार नाही.

(५) पडताळणी केलेले प्रत्येक दुय्यम मानक आणि पडताळणी केलेले प्रत्येक कार्यसाधक मानक हे विहित करण्यात येईल अशा ठिकाणी आणि अशा अभिरक्षेत ठेवण्यात येईल.

१५. (१) ज्यावेळी कोणतेही दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक याचा आकार किंवा स्वरूप या कारणामुळे त्यावर मुद्रा लावणे इष्ट किंवा व्यवहार्य नाही, असे राज्य शासनाचे मत असेल त्यावेळी, त्याला असा निदेश देता येईल की, अशा दुय्यम मानकावर किंवा कार्यसाधक मानकावर मुद्रा लावण्याऐवजी असे दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक, मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित झालेल्या मानकानुरूप आहे अशा आशयाचे एक प्रमाणपत्र द्यावे आणि अशा प्रकारे प्रमाणित करण्यात आलेले प्रत्येक दुय्यम मानक किंवा कार्यसाधक मानक यावर ज्या दिनांकास असे प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्या दिनांकास या अधिनियमान्वये यथोचित रीत्या मुद्रा लावण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. ज्यावर मुद्रा लावलो नाही तरी चालू शकेल अशी दुय्यम किंवा कार्यसाधक मानके.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले प्रत्येक प्रमाणपत्र हे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि ते ज्याच्याशी संबंधित आहे ते वजन किंवा माप स्पष्टपणे ओळखणे शक्य होईल असा तपशील त्यामध्ये अंतर्भूत असेल.

## प्रकरण पाच

### वजन व माप यांच्या उपयोगकर्त्यांची नोंदणी

१६. फिरता विक्रेता नसेल अशी कोणतीही व्यक्ती, या प्रकरणाच्या उपबंधानुसार तिची नोंदणी झालेली नसेल तर, कोणत्याही संव्यवहारात, किंवा औद्योगिक उत्पादनात किंवा संरक्षणासाठी कोणत्याही वजनाचा किंवा मापाचा उपयोग करणार नाही. संव्यवहारासाठी किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी वजन किंवा माप यांचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींनी स्वत:ची नोंदणी करून घेणे.

१७. (१) कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी, कोणत्याही वजनाचा किंवा मापाचा उपयोग सुरू करण्याचा किंवा चालू ठेवण्याचा उद्देश असलेली प्रत्येक व्यक्ती, या प्रयोजनासाठी ठेवावयाच्या नोंदवहीत (या कलमात यापुढे "उपयोगकर्त्यांची नोंदवही" म्हणून उल्लेखिलेली) आपले नाव समाविष्ट करण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या आत आणि असा तपशील अंतर्भूत असलेला अर्ज करील. नोंदणीची कार्यपद्धती.

(२) उपयोगकर्त्यांची नोंदवही विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने ठेवण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला अर्ज नियंत्रकाकडे, किंवा नियंत्रक यासंबंधात सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लेखी प्राधिकृत करील अशा अन्य व्यक्तीकडे करण्यात येईल आणि असा प्रत्येक अर्ज विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने आणि अशी फी भरण्यात आल्यावर करण्यात येईल.

(४) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला अर्ज मिळाल्यावर, नियंत्रक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती, अशा व्यक्तीचे नाव उपयोगकर्त्यांच्या नोंदवहीमध्ये समाविष्ट करील आणि अर्जदाराला, त्याचे नाव अशा प्रकारे समाविष्ट करण्यात आले आहे अशा आशयाचे एक प्रमाणपत्र देईल.

(५) पोटकलम (४) अन्वये देण्यात आलेले प्रमाणपत्र हे, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीपुरते विधिग्राह्य असेल आणि विहित करण्यात येईल अशा पुढील कालावधीसाठी व अशी फी भरण्यात आल्यानंतर, त्याचे वेळोवेळी नवीकरण करता येईल.

१८. कलम १७ च्या पोटकलम (१) अन्वये विहित करण्यात आलेला कालावधी संपल्यानंतर जो कोणी उपयोगकर्ता कोणत्याही संव्यवहारात वा औद्योगिक उत्पादनासाठी वा संरक्षणासाठी कोणतेही वजन किंवा माप उपयोगात आणील त्याला, या प्रकरणाच्या उपबंधांनुसार त्याची नोंदणी झालेली नसेल तर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. नोंदणी न केल्याबद्दल शिक्षा.

## प्रकरण सहा

### वजने किंवा मापे यांची निर्मिती, दुरुस्ती किंवा विक्री

लायसनशिवाय वजन किंवा माप किंवा विकणे अथवा यांची निर्मिती, दुरुस्ती व विक्री यास मनाई.

१९. (१) कोणतीही व्यक्ती, कोणतेही वजन किंवा माप बनवणे, निर्माण करणे, दुरुस्त करणे दुरुस्ती किंवा विक्रीसाठी देऊ करणे, मांडणे किंवा कब्जात ठेवणे या गोष्टी, नियंत्रकाने त्यासंबंधात अशा व्यक्तीला दिलेले, तसे करण्यास प्राधिकृत करणारे विधिग्राह्य लायसन तिच्याजवळ असल्याशिवाय करणार नाही :

परंतु, जी व्यक्ती, स्वतःच्या मालकीचे आणि कब्जात असलेले कोणतेही वजन किंवा माप सद्भावपूर्वक दुरुस्त करील तिला या पोटकलमात उल्लेखिलेले लायसन काढण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) या कलमान्वये दिलेले प्रत्येक लायसन—

(क) विहित करण्यात येईल—

(एक) अशा नमुन्यात असेल,

(दोन) अशी फी भरल्यावर देण्यात आलेले असेल, आणि

(तीन) अशा कालावधीपुरते विधिग्राह्य असेल.

(ख) त्याचे वेळोवेळी नवीकरण करता येईल, आणि

(ग) विहित करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंध त्यामध्ये अंतर्भूत असतील.

(३) राज्य अधिनियमान्वये देण्यात आलेले प्रत्येक लायसन, जर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असेल तर, त्याच्या विधिग्राह्यतेच्या कालावधीची समाप्ती किंवा ते रद्द केले जाणे यापैकी आधी घडणाऱ्या घटनेपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील आणि त्याच्या विधिग्राह्यतेचा कालावधी समाप्त झाल्यावर त्यांच्या नवीकरणासाठी त्याच्या विधिग्राह्यतेच्या कालावधीच्या समाप्तीच्या किमान एक महिना आधी विहित नमुन्यात अर्ज करण्यात आला असेल तर, या अधिनियमान्वये त्याचे नवीकरण करता येईल.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कोणतेही वजन किंवा माप बनविणारा, त्याचा निर्माता, दुरुस्तीकार किंवा विक्रेता म्हणून धंदा सुरू करण्याचा उद्देश असणारी प्रत्येक व्यक्ती, आपल्याला लायसन दिले जावे यासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशी फी भरल्यानंतर अर्ज करील आणि अशा तऱ्हेने देण्यात आलेल्या प्रत्येक लायसनचे नवीकरण त्यासाठी विहित करण्यात येईल अशा फी सह, अशा व्यक्तीकडून विधिग्राह्यतेच्या कालावधीच्या समाप्तीच्या किमान एक महिना आधी अर्ज करण्यात आला असेल तर, करता येईल.

(५) कोणतेही वजन किंवा माप बनवणाऱ्या, त्याची निर्मिती करणाऱ्या, ते दुरुस्त करणाऱ्या किंवा, प्रकरणपरत्वे, विकणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, तिच्या लायसनच्या विधिग्राह्यतेच्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी त्यांच्या नवीकरणासाठी अर्ज करण्यास पुरेशा कारणाने प्रतिबंध झाला होता अशी नियंत्रकाची खात्री झाली तर, तो, अशा विधिग्राह्यतेच्या कालावधीच्या समाप्तीच्या दिनांकापासून पुढील एक महिन्याच्या कालावधीत, असे लायसन देण्यासाठी देय असलेल्या फी पेक्षा अधिक नसेल इतकी आणखी फी तिने भरल्यानंतर, अर्ज करण्यास तिला परवानगी देऊ शकेल.

(६) लायसन देण्यासाठी किंवा त्याच्या नवीकरणासाठी केलेला कोणताही अर्ज, खालील गोष्टी खेरीज फेटाळला जाणार नाही—

(क) लायसनाचा अर्जदार, किंवा, प्रकरणपरत्वे, लायसनधारक याने प्रस्तावित कृती न करण्याबद्दल कारण दाखविण्यास त्याला वाजवी संधी देण्यात आलेली आहे ; आणि

(ख) नियंत्रकाची खालील बाबतीत खात्री झाली आहे की,

(एक) या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत अर्ज करण्यात आलेला नाही, किंवा

(दोन) लायसन देण्यासाठी वा त्याच्या नवीकरणासाठी केलेल्या अर्जामध्ये किंवा त्याच्या संबंधात अर्जदाराने असे कोणतेही विधान केले आहे की, जे महत्त्वाच्या तपशिलात चुकीचे किंवा खोटे आहे, किंवा

(तीन) अर्जदाराने मानक अधिनियम किंवा कोणताही राज्य अधिनियम किंवा ह्या अधिनियम किंवा मानक अधिनियम, राज्य अधिनियम किंवा ह्या अधिनियम या खाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश याच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले आहे.

(७) नियंत्रक, या अधिनियमाखाली लायसन देण्यात आलेल्या प्रत्येक दुरुस्तीकाराला विहित करण्यात येईल त्यानुसार दोनशे रुपयांहून अधिक नाही अशा रकमेची प्रतिभूती राज्य शासनास सादर करण्यास फर्मावू शकेल.

(८) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या उपयोगकर्त्याने (जो बनवणारा निर्माता, व्यापारी किंवा दुरुस्तीकार नाही अशा) केलेल्या विक्रीला लागू होणार नाही :

परंतु, नियंत्रकाच्या लेखी परवानगीशिवाय विहित वर्णनाच्या कोणत्याही वजनाची किंवा मापाची विक्री केली जाणार नाही.

(९) या अधिनियमान्वये दिलेले किंवा नवीकरण करण्यात आलेले प्रत्येक लायसन, लायसनधारक आपला धंदा जेथे चालवत असेल अशा कोणत्याही जागेत एखाद्या ठिकाणी प्रदर्शित केले जाईल.

**लायसन निलंबित करणे व रद्द करणे.**

२०. (१) या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या, नवीकरण करण्यात आलेल्या किंवा पुढे चालू ठेवण्यात आलेल्या कोणत्याही लायसनच्या धारकाने, लायसन देण्यासाठी, त्याच्या नवीकरणासाठी किंवा ते चालू ठेवण्यासाठी केलेल्या अर्जात किंवा त्या अर्जाच्यासंबंधात असे कोणतेही विधान केले आहे की, जे कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलामध्ये चुकीचे किंवा खोटे आहे अथवा त्याने मानक अधिनियम किंवा कोणताही राज्य अधिनियम किंवा हा अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश याच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केलेले आहे असे वाटण्यास नियंत्रकाकडे कोणतेही वाजवी कारण असेल तर त्याला, अशा लायसनधारकाविरुद्धची कोणतीही चौकशी किंवा संपरीक्षा पूर्ण होई-पर्यंत, असे लायसन निलंबित करता येईल :

परंतु, लायसनधारकाला प्रस्तावित कृतीविरुद्ध कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, असे कोणतेही लायसन निलंबित केले जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, लायसन निलंबित केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत या कलमात उल्लेखिलेली चौकशी किंवा संपरीक्षा पूर्ण करण्यात आली नाही तर, असे निलंबन उपरोक्त कालावधी संपल्यानंतर, विलोपित झालेले असेल.

(२) लायसनधारकाने पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या स्वरूपाचे खोटे किंवा चुकीचे विधान केलेले आहे अथवा त्या पोटकलमात उल्लेखिलेल्या कोणत्याही कायद्याचे किंवा आदेशाचे व्यतिक्रमण केलेले आहे अशी नियंत्रकाची खात्री, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, झाली असेल तर, तो असे लायसन रद्द करू शकेल :

परंतु, लायसनधारकाला प्रस्तावित कृतीविरुद्ध कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, असे कोणतेही लायसन रद्द केले जाणार नाही.

(३) जिचे लायसन निलंबित करण्यात आले आहे अशी प्रत्येक व्यक्ती, अशा निलंबनानंतर तात्काळ, असा लायसनधारक म्हणून कार्य करण्याचे थांबवील आणि अशा निलंबनाचा आदेश विलोपित केला जाईपर्यंत किंवा विलोपित झालेला असेपर्यंत असा लायसनधारक म्हणून पुन्हा धंदा सुरू करणार नाही.

(४) ज्याचे लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात आले आहे असा प्रत्येक लायसनधारक, अशा निलंबनानंतर, किंवा, प्रकरणपरत्वे, लायसन रद्द केल्यानंतर, असे लायसन ज्या प्राधिकाऱ्याने दिले असेल त्याच्याकडे ते स्वाधीन करील.

(५) ज्याचे लायसन रद्द करण्यात आले आहे असा प्रत्येक लायसनधारक, अशा रद्द करण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा पुरेसे कारण दाखविण्यात आल्यानंतर नियंत्रक मुभा देईल त्याप्रमाणे अशा दिनांकापासून तीन महिन्यांहून अधिक नसेल अशा कालावधीच्या आत, अशा रद्द होण्याच्या दिनांकास त्याच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असलेले वजन किंवा माप निकालात काढील आणि त्याने तसे करण्यात कसूर केली तर, नियंत्रक किंवा त्याच्याकडून यासंबंधात लेखी स्वरूपात प्राधिकृत करण्यात आलेला अन्य कोणताही अधिकारी, ती जप्त करू शकेल आणि निकालात काढू शकेल आणि त्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विहित करण्यात येईल अशा रीतीने वाटप करू शकेल.

**वजन किंवा माप यांची निर्मिती.**

२१. मानक अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून कोणतीही व्यक्ती—

(क) कोणतेही वजन किंवा माप, ते मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेले वजन व माप यांच्या मानकानुरूप असल्याखेरीज, बनवणार नाही किंवा त्याची निर्मिती करणार नाही.

(ख) मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या, वजन किंवा माप यांच्या युनिटाखेरीज अन्य कोणतेही वजन किंवा माप यांच्या युनिटानुरूप निर्देश ज्यावर असेल असे कोणतेही वजन किंवा माप बनविणार नाही किंवा त्याची निर्मिती करणार नाही.

**मुद्रा व लावलेली वजने किंवा मापे यांची विक्री वा त्यांचा उपयोग करण्यास मनाई.**

२२. कोणतेही वजन किंवा माप, त्याची पडताळणी झाल्याशिवाय आणि त्यावर मुद्रा लावण्यात आल्याशिवाय, विकले जाणार नाही अथवा विक्रीसाठी देऊ केले जाणार नाही किंवा मांडले जाणार नाही किंवा कब्जात ठेवले जाणार नाही अथवा कोणताही संव्यवहार किंवा औद्योगिक उत्पादन किंवा संरक्षण यासाठी त्याचा उपयोग केला जाणार नाही किंवा ते उपयोग करण्यासाठी ठेवले जाणार नाही :

परंतु, सुरुवातीला पडताळणी करण्यात आलेल्या आणि मानक अधिनियमाच्या कलम ४१ च्या पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या विशेष मोहोरेने मुद्रा लावण्यात आलेल्या कोणत्याही वजनाला किंवा मापाला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

निर्मात्या इत्यादींनी अभिलेख व नोंदवह्या ठेवणे. २३. (१) कोणतेही वजन किंवा माप बनवणारा, त्याचा निर्माता, दुरुस्तीकार किंवा व्यापारी आणि कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी त्याचा उपयोग करणारी प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येतील असे अभिलेख व नोंदवह्या ठेवील आणि निरीक्षकाकडून तसे करण्यास फर्मावण्यात आले तर, असे अभिलेख व नोंदवह्या निरीक्षणासाठी निरीक्षकापुढे हजर करील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कोणतेही वजन किंवा माप बनवणारा, त्याचा निर्माता, व्यापारी, दुरुस्तीकार किंवा उपयोगकर्ता यांच्याकडून केल्या जाणाऱ्या धंद्याचे स्वरूप वा व्याप लक्षात घेता, तसे करणे आवश्यक आहे असे नियंत्रकाचे मत असेल तर, तो आदेशाद्वारे अशा बनवणाऱ्यास, निर्मात्यास, व्यापाऱ्यास, दुरुस्तीकारास किंवा उपयोगकर्त्यास पोटकलम (१) च्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.

## प्रकरण सात

### वजन व माप यांची पडताळणी व त्यांवर मुद्रा लावणे

वजन व माप यांची पडताळणी व त्यांवर मुद्रा लावणे. २४. (१) कोणतेही वजन किंवा माप, जिच्याकडून कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी उपयोगात आणले आहे किंवा उपयोगात आणले जाण्याचा उद्देश आहे किंवा उपयोगात आणले जाण्याची शक्यता आहे असे दर्शविणाऱ्या परिस्थितीत ते वजन किंवा माप, ज्याच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणात असेल अशी प्रत्येक व्यक्ती, असे वजन किंवा माप अशा तऱ्हेने उपयोगात आणण्यापूर्वी, नियंत्रक सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी आणि अशा वेळेत (यात यापुढे "विनिर्दिष्ट ठिकाण" किंवा "विनिर्दिष्ट वेळ" म्हणून उल्लेखिलेल्या), विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर, अशा वजनाची किंवा मापाची पडताळणी करवून घेईल.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले प्रत्येक वजन किंवा माप याची विहित करण्यात येईल अशा नियतकालिक कालांतरांनी फेरपडताळणी केली जाईल.

*स्पष्टीकरण.*—शंकानिरसनार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, केवळ घरगुती प्रयोजनासाठी उपयोगात आणले जाणारे कोणतेही वजन किंवा माप याच्यासंबंधात कोणतीही नियतकालिक फेरपडताळणी आवश्यक असणार नाही.

(३) प्रत्येक निरीक्षक, कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या पडताळणीच्या प्रयोजनार्थ, विनिर्दिष्ट ठिकाणी (त्याच्या अधिकारीतेच्या स्थानिक सीमांमध्ये) उपस्थित राहील आणि अशा ठिकाणी व अशा वेळेच्या आत त्याच्याकडे आणलेल्या प्रत्येक वजनाची किंवा मापाची पडताळणी करील, आणि असे वजन किंवा माप मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानकानुरूप आहे अशी त्याची खात्री पटल्यास त्यांवर आपली मुद्रा लावील :

परंतु, जेव्हा कोणतेही वजन किंवा माप असे असेल की, ते ज्या ठिकाणी आहे तेथून हलविता येणे शक्य नसेल किंवा हलविण्यात येऊ नये असे असेल, तेव्हा निरीक्षक, ते ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी त्याच्या पडताळणीसाठी विहित करण्यात येईल अशी उपाययोजना करील.

(४) ज्यावेळी पोटकलम (३) अन्वये कोणतीही पडताळणी करण्यात आली असेल त्यावेळी, निरीक्षक, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तीला, त्याच्याकडून पडताळणी करण्यात येऊन मुद्रा लावण्यात आलेले वजन किंवा माप याचा तपशील दर्शविणारे विहित नमुन्यातील एक प्रमाणपत्र देईल.

(५) ज्यावेळी कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या आकारामुळे किंवा स्वरूपामुळे त्यांवर मुद्रा लावणे इष्ट वा व्यवहार्य नाही असे नियंत्रकाचे मत असेल त्यावेळी, त्याला लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, असे वजन किंवा माप, यावर मुद्रा लावण्याऐवजी असे वजन किंवा माप मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानकानुरूप आहे, अशा आशयाचे एक प्रमाणपत्र देण्यात यावे आणि अशाप्रकारे प्रमाणित करण्यात आलेले प्रत्येक वजन किंवा माप, असे प्रमाणपत्र ज्या दिनांकास देण्यात आले असेल त्या दिनांकास या अधिनियमान्वये यथोचित रीत्या पडताळणी करून त्यावर मुद्रा लावण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(६) पोटकलम (५) मध्ये उल्लेखिलेले प्रत्येक प्रमाणपत्र हे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि ते ज्या वजनाच्या किंवा मापाच्या संबंधात असेल ते वजन किंवा माप स्पष्टपणे ओळखणे ज्यायोगे शक्य होईल असा तपशील त्यात अंतर्भूत असेल.

पडताळणी प्रमाणपत्र प्रदर्शित करणे. २५. या अधिनियमान्वये देण्यात आलेले प्रत्येक पडताळणी प्रमाणपत्र, हे, असे वजन किंवा माप, ज्या कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी उपयोगात आणले जात असेल किंवा उपयोगात आणण्याचा उद्देश असेल किंवा उपयोगात आणले जाण्याची शक्यता असेल त्या जागेत एखाद्या ठळक ठिकाणी प्रदर्शित केले जाईल.

२६. (१) या अधिनियमान्वये ज्याची यथोचित रीत्या पडताळणी करून मुद्रा लावण्यात आलेली आहे किंवा ज्याची यथोचित रीत्या पडताळणी करून मुद्रा लावण्यात आली असल्याचे समजण्यात आले आहे असे प्रत्येक वजन किंवा माप हे, मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित झालेल्या मानकानुरूप असण्याचे बंद झाले आहे असे निरीक्षण किंवा पडताळणीअंती आढळून आले नसल्यास, मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यावर जेथे मुद्रा लावण्यात आली असेल, अशा राज्यातील प्रत्येक ठिकाणी मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित झालेल्या मानकांनुरूप असल्याचे समजण्यात येईल. यथोचित रीत्या मुद्रा लावलेले वजन किंवा माप यांची विधिग्राह्यता.

(२) या अधिनियमान्वये ज्याची यथोचित रीत्या पडताळणी करून मुद्रा लावण्यात आली आहे किंवा ज्याची यथोचित रीत्या पडताळणी करून मुद्रा लावण्यात आली असल्याचे समजण्यात आले आहे असे कोणतेही वजन किंवा माप यावर, त्याची जेथे मूलतः पडताळणी करून मुद्रा लावण्यात आली असेल त्या ठिकाणाव्यतिरिक्त केवळ राज्यातील अन्य ठिकाणी त्याचा उपयोग करण्यात येत आहे या वस्तुस्थितीच्या कारणावरून, पुन्हा मुद्रा लावण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु, ज्याची एका ठिकाणी मांडणी केलेली आहे असे पडताळणी केलेले वजन किंवा माप हे तेथून काढून दुसऱ्या ठिकाणी पुनःस्थापित करण्यात येईल तेव्हा असे वजन किंवा माप, त्याची यथोचित रीत्या फेरपडताळणी केली गेल्याशिवाय व मुद्रा लावली गेल्याशिवाय अशा वजनाची किंवा मापाची नियतकालिक फेरपडताळणी करण्याची वेळ झालेली नसली तरीही, उपयोगात आणले जाणार नाही.

(३) ज्यावेळी एखाद्या पडताळणी केलेल्या वजनाची किंवा मापाची दुरुस्ती करण्यात आली असेल— मग ती एखाद्या लायसनधारक दुरुस्तीकाराकडून करण्यात आलेली असो अथवा त्याची मालकी किंवा कब्जा असणाऱ्या व्यक्तीकडून करण्यात आलेली असो—त्यावेळी असे वजन किंवा माप, त्याची यथोचित रीत्या फेरपडताळणी केली गेल्याशिवाय व मुद्रा लावली गेल्याशिवाय, अशा वजनाची किंवा मापाची नियतकालिक फेरपडताळणी करण्याची वेळ झालेली नसली तरीही, उपयोगात आणले जाणार नाही.

## प्रकरण आठ

### निरीक्षण, झडती, जप्ती व समपहरण

२७. (१) निरीक्षकाला, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, कोणतेही वजन किंवा माप कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी उपयोगात आणले आहे किंवा उपयोगात आणले जाण्याचा उद्देश आहे किंवा उपयोगात आणले जाण्याची शक्यता आहे असे ज्यावरून दिसून येईल अशा परिस्थितीत, सर्व वाजवी वेळी,— निरीक्षण करण्याची शक्ती.

(एक) कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असेल असे, किंवा

(दोन) कोणत्याही जागेत किंवा जागेवर असेल असे, वजन किंवा माप यांचे निरीक्षण व चाचणी करता येईल, आणि असे वजन किंवा माप मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित झालेल्या मानकांनुरूप आहे किंवा नाही त्याची पडताळणीही त्यास करता येईल.

(२) कोणत्याही संव्यवहारात उपयोगात आणल्या गेलेल्या कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या अचूकतेबद्दल खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, निरीक्षकाला, अशा संव्यवहाराच्या ओघात कोणत्याही व्यक्तीला विकलेल्या वा तिच्याकडे पोचवण्यात आलेल्या वस्तूचे वजन किंवा माप याचीही चाचणी करता येईल.

२८. (१) कोणतेही वजन किंवा माप याच्या संबंधात, या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध करण्यात आला आहे किंवा केला जाण्याची शक्यता आहे असे अथवा कोणतेही वजन किंवा माप मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानकांनुरूप नाही, असे वाटण्यास निरीक्षकाला कोणतेही वाजवी कारण असेल तर, त्याला,— वजन किंवा माप किंवा अभिलेख निरीक्षणासाठी हजर करण्यास फर्माविण्याची निरीक्षकाची शक्ती.

(एक) जे अशा व्यक्तीकडून उपयोगात आणले जात असेल किंवा अशा व्यक्तीने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून उपयोगात आणले जाण्याची व्यवस्था केली असेल, किंवा

(दोन) जे उपयोगात आणले जाण्यासाठी अशा व्यक्तीच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असेल, किंवा

(तीन) कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनात किंवा संरक्षणासाठी उपयोगात आणण्याकरता कोणत्याही जागेत किंवा जागेवर ठेवण्यात आले असेल,

असे प्रत्येक वजन किंवा माप, जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असेल त्या व्यक्तीला, सर्व वाजवी वेळांमध्ये ते त्याच्यापुढे निरीक्षणासाठी हजर करण्यास फर्मावता येईल.

(२) निरीक्षक, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले वजन किंवा माप याच्या संबंधातील प्रत्येक दस्तऐवज किंवा इतर अभिलेख दाखल करण्यास फर्मावू शकेल आणि असे वजन किंवा माप अभिरक्षेत असलेली व्यक्ती अशा मागणीचे पालन करील.

(३) कलम २७ अन्वये किंवा या कलमान्वये निरीक्षण केल्यावर, निरीक्षक, खालील वजन किंवा मापावरील मुद्रा पुसून टाकील,—

(क) पडताळणीची वेळ झाली असताना अशा पडताळणीसाठी सादर न केलेले कोणतेही वजन किंवा माप ;

(ख) पूर्वी पडताळणी करून मुद्रा लावल्यानंतर ज्याच्यामध्ये दुरुस्ती किंवा पुनःसमायोजन करण्यात आले आहे आणि अशा दुरुस्तीनंतर किंवा पुनःसमायोजनानंतर मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित झालेल्या मानकानुरूप नसेल असे कोणतेही वजन किंवा माप ;

(ग) मोडल्यामुळे, खोचे पडल्यामुळे किंवा अन्यथा सदोष असल्याच्या कारणामुळे ज्यामध्ये योग्य समायोजन केले जाऊ शकत नाही असे कोणतेही वजन किंवा माप ;

(घ) जे मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित झालेल्या मानकानुरूप नाही किंवा जे त्या मानकानुरूप करता येणे शक्य नाही असे खंड (ख) किंवा (ग) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले कोणतेही वजन किंवा माप याव्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन किंवा माप :

परंतु, असे वजन किंवा माप यांतील दोष किंवा त्रुटी ही ज्यावेळी, निरीक्षकाच्या मते अशा प्रकारची नसेल की, मुद्रा ताबडतोब पुसून टाकणे आवश्यक ठरावे त्यावेळी, तो असे वजन किंवा माप याच्या उपयोगकर्त्यावर त्या वजनात किंवा मापात आढळलेला दोष किंवा त्रुटी याबद्दल त्याला कळवणारी आणि तो विनिर्दिष्ट करील अशा आठ दिवसांहून अधिक नसणाऱ्या कालावधीच्या आत, तो दोष किंवा त्रुटी नाहीशी करण्यास त्याला फर्माविणारी एक नोटीस बजावील, आणि,—

(एक) त्या कालावधीच्या आत उपयोगकर्त्याने तो दोष किंवा त्रुटी नाहीशी केली नाही तर मुद्रा पुसून टाकील, किंवा

(दोन) जे वजन किंवा माप मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित केलेल्या मानकानुरूप होईल अशा रीतीने तो दोष किंवा त्रुटी नाहीशी करण्यात आली असेल तर, अशा वजनाची किंवा मापाची पडताळणी करील आणि त्यावर आपली मुद्रा लावील.

स्पष्टीकरण.—कोणतेही वजन किंवा माप यावरील मुद्रा पुसून टाकल्यामुळे, या अधिनियमाच्या उपबंधान्वये असे वजन किंवा माप जप्त करण्याची निरीक्षकाची शक्ती काढून घेतली जाणार नाही किंवा ती कमी केली जाणार नाही.

**प्रवेश करण्याची व निरीक्षण करण्याची शक्ती.** २९. कोणत्याही वजनाच्या, मापाच्या किंवा वजनाने, मापाने किंवा नगांवर विकल्या जाणाऱ्या, पोचविल्या जाणाऱ्या किंवा वितरित केल्या जाणाऱ्या अन्य मालाच्या संबंधात, या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध करण्यात आला आहे किंवा केला जाण्याची शक्यता आहे असे निरीक्षकाला, कोणत्याही व्यक्तीकडून देण्यात आलेल्या आणि त्याने लिहून घेतलेल्या माहितीवरून किंवा त्याच्या व्यक्तिगत माहितीवरून किंवा अन्यथा वाटण्यास कोणतेही कारण असेल तर त्याला, कोणत्याही वाजवी वेळी,—

(एक) असे वजन किंवा माप जेथे—

(क) बनवले जाते, त्याची निर्मिती केली जाते, ते दुरुस्त केले जाते किंवा विकले जाते, अथवा

(ख) कोणत्याही संव्यवहारात वा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी ते उपयोगात आणले जाते किंवा उपयोगात आणले जाण्यासाठी ठेवले असल्याचे समजले जाते ;

(दोन) जेथे असा माल निर्माण केला जातो, पाकीटबंद केला जातो, वितरित केला जातो किंवा पाकीटबंद स्वरूपात विकला जातो, विक्रीसाठी ठेवला जातो किंवा देऊ केला जातो,

अशा कोणत्याही जागी प्रवेश करता येईल आणि कोणत्याही वजनाचे किंवा मापाचे किंवा कोणत्याही पाकिटातील निव्वळ वस्तूचे वजनाने, मापाने वा नगांनी निरीक्षण करता येईल किंवा पडताळणी करता येईल.

आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही दस्तऐवजाचे किंवा अन्य अभिलेखाचे निरीक्षण करता येईल.

**झडती घेण्याची शक्ती.** ३०. (१) ज्यावेळी या अधिनियमान्वये जप्त केले जाण्यास पात्र असेल असे कोणतेही वजन किंवा माप अथवा कोणतेही वजन किंवा माप यासंबंधातील या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये नियंत्रकाच्या मते उपयुक्त किंवा संबद्ध होईल असा कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू कोणत्याही ठिकाणी लपविण्यात आली आहे असे समजण्यास त्याला कारण असेल त्यावेळी, तो, असे वजन किंवा माप, दस्तऐवज किंवा वस्तू यांसाठी झडती घेऊ शकेल किंवा निरीक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याला झडती घेण्यास व ते जप्त करण्यास प्राधिकृत करू शकेल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याची कलमे १०० व १०२ यांचे उपबंध अशा प्रत्येक झडतीस लागू होतील.

(२) पोटकलम (१) अन्वये नियंत्रकाकडून देण्यात आलेले प्रत्येक प्राधिकारपत्र हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ९३ मध्ये निर्देशिलेले वॉरंट असल्याचे मानण्यात येईल.

**निरीक्षकाची कोणतेही वजन किंवा माप जप्त करण्याची शक्ती.**

३१. (१) ज्याच्या संबंधात या अधिनियमान्वये एखादा अपराध करण्यात येत असेल किंवा करण्यात आला असल्याचे दिसत असेल अथवा असा अपराध करण्यासाठी ज्याचा उपयोग करण्याचा उद्देश असेल किंवा उपयोग केला जाण्याची शक्यता असेल, असे कोणतेही वजन किंवा माप, निरीक्षकाला जप्त करता व अडकवून ठेवता येईल आणि त्याबरोबर त्याला अशा वजनाने वा मापाने विकलेला किंवा पोचता केलेला अथवा विकण्याची अथवा पोचता करण्याची व्यवस्था करण्यात आलेला कोणताही माल जप्त करता व अडकवून ठेवता येईल :

परंतु, ज्यावेळी या पोटकलमान्वये जप्त करण्यात आलेला कोणताही माल फार लवकर किंवा नैसर्गिकरीत्या कुजणारा असा असेल त्यावेळी, निरीक्षकाला असा माल विहित करण्यात येईल अशा रीतीने, निकालात काढता येईल.

(२) ज्यावेळी कोणतेही वजन, माप किंवा कोणतीही वस्तू, पोटकलम (१) अन्वये जप्त करण्यात व अडकवून ठेवण्यात आली असेल त्यावेळी, असे वजन, माप किंवा वस्तु याच्याशी संबंधित कोणताही दस्तऐवज किंवा इतर अभिलेखही निरीक्षकाला जप्त करता येईल व अडकवून ठेवता येईल.

(३) या कलमान्वये करण्यात आलेल्या प्रत्येक जप्तीला, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १०२ चे उपबंध लागू होतील.

**समपहरण.**

३२. या अधिनियमाच्या उपबंधान्वये जप्त करण्यात आलेले प्रत्येक खोटे किंवा पडताळणी न केलेले वजन किंवा माप हे (मानक अधिनियमाच्या कलम ३० मध्ये ज्यांचा निर्देश केलेला आहे त्या व्यतिरिक्त इतर) शासनाकडून समपहृत होण्यास पात्र असेल :

परंतु, ज्या व्यक्तीकडून असे वजन किंवा माप जप्त करण्यात आले असेल तिने त्याची विहित कालावधीच्या आत पडताळणी करून घेऊन त्यावर मुद्रा लावून घेतल्यास असे पडताळणी न केलेले वजन किंवा माप शासनाकडे समपहृत केले जाणार नाही.

## प्रकरण नऊ

### पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंची राज्यांतर्गत विक्री व वितरण यासंबंधातील उपबंध

**मानक अधिनियम आणि त्याअन्वये केलेले नियम यांमधील पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंच्या संबंधातील उपबंध पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंच्या राज्यांतर्गत विक्रीस लागू असणे.**

३३. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेला मानक अधिनियम आणि त्याअन्वये केलेले नियम यामधील पाकीटबंद स्वरूपातील वस्तूंच्या संबंधातील उपबंध हे, होईल तेथवर, त्यातील "केंद्र शासन", "मानक अधिनियम" आणि "संचालक" यांच्या कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, अनुक्रमे "राज्य शासन", "हा अधिनियम" आणि "नियंत्रक" यांचा उल्लेख आहे असा लावण्यात येईल आणि या बदलाच्या अधीनतेने, उपरोक्त उपबंध, राज्यात वितरित केल्या जाणाऱ्या, विकल्या जाणाऱ्या किंवा विक्रीसाठी ठेवल्या जाणाऱ्या, देऊ केलेल्या किंवा मांडलेल्या पाकीटबंद स्वरूपातील प्रत्येक वस्तुला, जणू काही ते उपबंध या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अधिनियमित करण्यात आले असल्या-प्रमाणे, लागू होतील.

(२) पाकीटबंद स्वरूपात राज्यात विकण्याचा वा वितरित करण्याचा उद्देश असलेली कोणतीही वस्तू पाकीटबंद करणे विनियमित करण्यासाठी अथवा पाकीटबंद स्वरूपातील कोणत्याही वस्तूची राज्यांतर्गत विक्री किंवा वितरण विनियमित करण्यासाठी राज्य शासनास मानक अधिनियमाशी वा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, "पाकीटबंद स्वरूपातील वस्तू" याला मानक अधिनियमा-मध्ये जो अर्थ नेमून दिलेला आहे तोच अर्थ असेल आणि त्यामध्ये आधीच पाकीटबंद करण्यात आलेल्या वस्तूंचा समावेश होईल.

## प्रकरण दहा

### कोणत्याही वस्तूची विक्री—मग अशी विक्री परिमाणाने असो किंवा नगाने असो—आणि वस्तूंची राशींनी विक्री यासंबंधातील कोणतीही रूढी किंवा परिपाठ यांबाबतचे उपबंध.

**अतिरिक्त परिमाण देणे आवश्यक ठरवणारी रूढी किंवा परिपाठ समाप्त होणे.**

३४. (१) कोणतीही चीजवस्तू, जिन्नस किंवा सेवा यासंबंधातील कोणतीही संविदा किंवा अन्य करार यामध्ये वजन, माप किंवा नग या स्वरूपात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या परिमाणापेक्षा चीजवस्तू, जिन्नस किंवा सेवा हिची जास्त किंवा कमी मागणी करण्यास, ती स्वीकारण्यास अथवा तिची मागणी करविली जाण्याची किंवा स्वीकारली जाण्याची व्यवस्था करण्यास परवानगी देणारी कोणत्याही स्वरूपाची कोणतीही रूढी, परिपाठ, प्रथा किंवा पद्धत शून्य होईल.

(२) नगाने विकल्या जाणाऱ्या कोणत्याही वस्तूच्या संबंधात त्या वस्तूच्या जितक्या नगांचे पैसे देण्यात आले असतील त्यापेक्षा, अशा वस्तू एका निश्चित संख्येने अतिरिक्त देण्याची रूढी किंवा परिपाठ असेल तेव्हा अशी रूढी किंवा परिपाठ, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर आणि तेव्हापासून समाप्त होईल.

राशीची विक्री.

३५. (१) कोणतीही वस्तू राशींनी विकण्यात येत असेल तेव्हा, प्रत्येक राशीत असलेल्या वस्तूचे अदमासे वजन, माप किंवा नग विक्रेत्याने किंवा त्याचा कोणताही अभिकर्ता असल्यास, त्याने, तोंडी किंवा प्रत्येक राशीवर लावलेल्या लेखी सूचनेद्वारे ठळकपणे जाहीर केले पाहिजे :

परंतु, अशा राशीतील वस्तूंची एकूण किंमत दोन रुपयांहून अधिक नसेल तेव्हा, अशा तऱ्हेने जाहीर करण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) राशीने विकलेल्या कोणत्याही वस्तूचे वजन केल्यावर, ती मापल्यावर किंवा तिची गणना केल्यावर असे वजन केल्यानंतर, मापल्यानंतर किंवा गणना केल्यानंतर निश्चित केलेले तिचे वजन, माप किंवा गणना, विक्रेत्याने किंवा त्याच्या अभिकर्त्याने जाहीर केलेले अदमासे वजन, माप किंवा गणना यांच्यापेक्षा कमी आहे आणि ही तूट, जाहीर केलेले वजन, माप किंवा गणना यांच्या पाच टक्क्यांहून अधिक आहे असे आढळून येईल त्यावेळी त्या विक्रेत्याने खोटे वजन किंवा माप उपयोगात आणले असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण अकरा

### अपराध व शास्ती

वजन किंवा माप प्रमानक निर्माण करणे, इ. साठी शास्ती.

३६. जो कोणी,—

(क) मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानकानुरूप असतील त्याखेरीज अन्यथा कोणतेही वजन किंवा माप मानक बनवील किंवा निर्माण करील किंवा बनवण्याची किंवा निर्माण करण्याची व्यवस्था करील त्याला (मानक अधिनियमाद्वारे त्याला तसे करण्यास परवानगी देण्यात आली असेल ते खेरीज करून), अथवा

(ख) मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मानकाखेरीज अन्य मानकानुरूप निर्माण केलेले कोणतेही वजन किंवा माप—

(एक) विक्री किंवा अन्यथा हस्तांतरित करील अथवा विक्री करविण्याची किंवा हस्तांतरित करण्याची व्यवस्था करील, किंवा

(दोन) भाड्याने देईल किंवा भाड्याने देण्याची व्यवस्था करील त्याला [1][कमीत कमी तीन महिने परंतु ती एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी कमीत कमी सहा महिने परंतु ती तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.]

मोहोर इ. नकली तयार करण्याबद्दल शास्ती.

३७. (१) जो कोणी,—

(एक) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अथवा मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही मोहोर नकली तयार करील, अथवा

(दोन) कोणतीही नकली मोहोर विकील किंवा तिची अन्यथा विल्हेवाट लावील, अथवा

(तीन) कोणतीही नकली मोहोर कब्जात ठेवील, अथवा

(चार) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अथवा मानक अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अथवा या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही मुद्रा नकली तयार करील, अथवा

(पाच) हा अधिनियम किंवा मानक अधिनियम अथवा यांच्यापैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये लावलेली कोणतीही मुद्रा काढून टाकील किंवा अशा तऱ्हेने केलेल्या कोणत्याही मुद्रेमध्ये अनधिकृत फिरवाफिरव करील, अथवा

(सहा) हा अधिनियम किंवा मानक अधिनियम या अन्वये वा त्यांच्यापैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये लावलेली कोणतीही मुद्रा काढून टाकील आणि अशा प्रकारे काढून टाकलेली मुद्रा अन्य कोणतेही वजन किंवा माप यावर किंवा त्यामध्ये लावील, अथवा

---

१. १९८६ चा विशोधन अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ जुलै १९८७ रोजी व तेव्हापासून).

(सात) कोणत्याही व्यक्तीला फसविण्याच्या दृष्टीने किंवा त्याद्वारे कोणतीही व्यक्ती फसविली जाण्याची शक्यता आहे असे माहीत असताना किंवा तसे मानण्यास कारण असताना, कोणतेही वजन किंवा माप यात कोणत्याही प्रकारे वाढ करील किंवा ते कमी करील किंवा त्यात फेरफार करील तर,

[1][त्याला कमीत कमी सहा महिने परंतु, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल, व दुसऱ्या व नंतरच्या अपराधासाठी कमीत कमी एक वर्ष परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.]

(२) जो कोणी, बेकायदेशीर मार्गाने हा अधिनियम किंवा मानक अधिनियम याद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही मोहोरेचा कब्जा मिळवील आणि अशी कोणतीही मोहोर, तीद्वारे लावलेली मुद्रा, हा अधिनियम किंवा मानक अधिनियम याद्वारे किंवा अन्वये प्राधिकृत करण्यात आली आहे असे दर्शविण्यासाठी कोणतेही वजन किंवा माप यावर मुद्रा लावण्यासाठी उपयोगात आणील किंवा उपयोगात आणण्याची व्यवस्था करील त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

(३) हा अधिनियम किंवा मानक अधिनियम याद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या एखाद्या मोहोरेचा कायदेशीर कब्जा असलेला जो कोणी, अशी मोहोर उपयोगात आणण्याचा कोणताही कायदेशीर प्राधिकार नसताना तिचा उपयोग करील किंवा उपयोग करण्याची व्यवस्था करील त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

(४) जो कोणी, कोणतेही वजन किंवा माप, त्यावर नकली मुद्रा असल्याचे माहीत असताना किंवा त्यास तसे मानण्यास कारण असताना, विकील किंवा विक्रीसाठी देऊ करील वा मांडून ठेवील अथवा त्याची अन्यथा विल्हेवाट लावील, त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

*वस्तू इ. ची अमानक वजन किंवा माप याद्वारे विक्री वा पोचवणी याबद्दल शास्ती.*

३८. (१) मानक अधिनियमाद्वारे त्यास तसे करण्यास परवानगी देण्यात आली असेल ते खेरीज करून, जो कोणी, कोणतीही वस्तू, चीजवस्तू किंवा जिन्नस, वजन किंवा माप मानक या व्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन, माप किंवा नग याद्वारे विकेल किंवा विकण्याची व्यवस्था करील अथवा पोचवणी करील किंवा पोचवणी करण्याची व्यवस्था करील, [2][त्याला कमीत कमी पाचशे रुपये, परंतु दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी कमीत कमी तीन महिने परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.]

(२) जो कोणी, वजन किंवा माप मानक याव्यतिरिक्त अन्य कोणतेही वजन, माप किंवा नग या स्वरूपात कोणतीही सेवा देईल किंवा देण्याची व्यवस्था करील, त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

*वजन किंवा माप अमानक उपयोग करण्याकरिता ठेवण्याबद्दल आणि इतर व्यतिक्रमणांबद्दल शास्ती.*

३९. (१) जो कोणी,—

(क) वजन करण्यासाठी वा मापण्यासाठी, अथवा

(ख) कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी वा संरक्षणासाठी, वजन किंवा माप मानक याखेरीज अन्य कोणतेही वजन किंवा माप, कोणत्याही जागेत, उपयोगात आणले जात आहे किंवा त्याचा उपयोग केला जाण्याची शक्यता आहे असे दर्शवण्याच्या परिस्थितीत ठेवील,

त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

(२) जो कोणी,—

(एक) कोणतीही चीज वस्तू किंवा जिन्नस वजनाने, मापाने किंवा नगांनी विकताना, खरेदीदाराला, ती चीजवस्तू किंवा जिन्नस यांच्या ज्या परिमाणाच्या किंवा नगाच्या संबंधात त्याने संविदा केली असेल आणि पैसे दिले असतील त्यापेक्षा कमी परिमाणात किंवा नगात पोचवणी करील किंवा पोचवणी करण्याची व्यवस्था करील, अथवा

---

१. १९८६ चा विशोधन अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ जुलै १९८७ रोजी व तेव्हापासून.)

२. १९८६ चा विशोधन अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ जुलै १९८७ पासून.)

(दोन) वजन, माप, किंवा नग याद्वारे कोणतीही सेवा देताना, ज्यासाठी संविदा केली असेल आणि पैसे दिले असतील त्यापेक्षा कमी सेवा देईल, अथवा

(तीन) कोणतीही चीजवस्तू किंवा जिन्नस वजनाने, मापाने किंवा नगांनी खरेदी करताना, परिमाण किंवा नग या संबंधात ज्यासाठी संविदा केली असेल किंवा पैसे भरले असतील त्यापेक्षा ती चीजवस्तू किंवा जिन्नस, कपटाने अधिक प्रमाणात स्वीकारील किंवा स्वीकारण्याची व्यवस्था करील, अथवा

(चार) वजनाने, मापाने किंवा नगाने कोणतीही सेवा मिळवताना ती सेवा, ज्यासाठी संविदा केली असेल किंवा पैसे भरले असतील त्यापेक्षा अधिक प्रमाणात मिळवील त्याला पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, जो कोणी, अशी कोणतीही संविदा किंवा इतर करार करील (निर्यातीसाठी नसेल अशी संविदा किंवा इतर करार) की, ज्यामधील कोणतेही वजन, माप वा नग, वजन किंवा माप मानक यापेक्षा इतर परिभाषेत व्यक्त करण्यात आले असेल तेव्हा, त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

कलम १० च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

४०. जो कोणी, माल, सेवा, उपक्रम यांच्या कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गाच्या किंवा वजन किंवा माप यांच्या उपयोगाच्या संबंधात कोणत्याही संव्यवहारात अथवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी, कलम १० अन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेले वजन, माप किंवा नग या व्यतिरिक्त इतर कोणतेही वजन, माप किंवा नग उपयोगात आणील त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

कलम ११ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

४१. मानक अधिनियमान्वये तसे करण्यास त्याला परवानगी देण्यात आली असेल ते खेरीज करून, जो कोणी, विक्री केलेल्या, हस्तांतरित केलेल्या, वितरित केलेल्या वा पोचवणी केलेल्या कोणत्याही मालासंबंधात वा जिन्नसाच्यासंबंधात अथवा पुरवलेल्या सेवेसंबंधात, वजन किंवा माप मानक यानुसार असेल त्याखेरीज अन्यथा,—

(क) कोणतीही किंमत किंवा आकार कळवील किंवा किंमत किंवा आकार जाहीर करील, अथवा

(ख) कोणतीही किंमत सूची, बीजक, रोखीचे टिपण किंवा इतर दस्तऐवज काढील किंवा प्रदर्शित करील, अथवा

(ग) कोणतीही जाहिरात, भित्तीपत्रक किंवा इतर दस्तऐवज यामध्ये कोणतेही वजन किंवा माप नमूद करील, अथवा

(घ) कोणत्याही पुडक्यातील निव्वळ वस्तूचे वजन, माप किंवा नग कोणतेही लेबल (खणचिठ्ठी) खोका किंवा इतर वस्तू यावर दर्शवील, अथवा

(ङ) कोणताही संव्यवहार, औद्योगिक उत्पादन किंवा संरक्षण या संबंधात कोणतेही परिमाण वा आकार व्यक्त करील,

त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

कलम १९ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

४२. या अधिनियमान्वये लायसन मिळविणे आवश्यक असणारा जो कोणी, तसे करण्यास त्यास शक्ती प्रदान करणारे वैध लायसन जवळ नसताना कोणतेही वजन किंवा माप बनवील, ते निर्माण करील, दुरुस्त करील किंवा विकील अथवा दुरुस्ती वा विक्री यासाठी देऊ करील, मांडील किंवा कब्जात ठेवील त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची अथवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची अथवा या दोन्ही आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

कलम २० च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

४३. या अधिनियमान्वये देण्यात आलेले वा नवीकरण करण्यात आलेले किंवा चालू ठेवण्यात आलेले लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात आल्यावर जो लायसनधारक या अधिनियमान्वये लायसनधारक म्हणून कार्य करण्याचे बंद करणार नाही किंवा त्याबाबत कसूर करील त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल.

कलम २१ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

४४. मानक अधिनियमान्वये त्याला तसे करण्यास परवानगी दिली असेल तेवढी बाब खेरीज करून एरव्ही जो कोणी,—

(क) जे वरकरणी त्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यास आलेल्या मानकानुरूप असल्याचे दर्शवण्यात आले असले तरी प्रत्यक्षात उक्त मानकानुरूप नसेल असे, अथवा

(ख) त्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या वजन व माप यांच्या मानकांनुरूप नसणाऱ्या अशा कोणत्याही वजनाची किंवा मापाची खूण त्यांवर असेल असे, मग अशी खूण, वजन किंवा माप त्यांच्यावरील उक्त मानकांनुरूप असलेल्या खूणांच्या जोडीने असो किंवा नसो,

कोणतेही वजन किंवा माप तयार करील किंवा निर्माण करील त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची अथवा दोन्ही आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

४५. जो कोणी,—

(क) या अधिनियमान्वये ज्याची पडताळणी केलेली नाही आणि ज्यावर मुद्रा लावलेली नाही असे कोणतेही वजन किंवा माप विकील, विक्रीसाठी देऊ करील, मांडून ठेवील किंवा कब्जात ठेवील, अथवा

**कलम २२ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

(ख) या अधिनियमान्वये ज्याची पडताळणी करणे आणि ज्यावर मुद्रा लावणे आवश्यक आहे असे कोणतेही वजन किंवा माप तशा प्रकारे पडताळणी न करता व त्यावर मुद्रा न लावता उपयोगात आणील किंवा उपयोगासाठी ठेवील,

त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल :

परंतु, घरगुती प्रयोजनासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या बाबतीत, खंड (ख) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

४६. कलम २३ अन्वये कोणताही अभिलेख किंवा नोंदवही ठेवण्यास फर्मावण्यात आले असताना जो कोणी, तसे करणार नाही किंवा तसे करण्यात कसूर करील अथवा निरीक्षकाने कोणताही अभिलेख किंवा नोंदवह्या त्याच्या निरीक्षणासाठी सादर करण्यास फर्मावले असताना, तसे करणार नाही किंवा, तसे करण्यात कसूर करील त्याला, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल तक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्य-दंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**कलम २३ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

४७. कलम २४ अन्वये कोणतेही वजन किंवा माप पडताळणीसाठी किंवा फेरपडताळणीसाठी सादर करण्यास फर्मावण्यात आल्यानंतर जो कोणी, वाजवी कारणाशिवाय तसे करणार नाही किंवा तसे करण्यात कसूर करील त्याला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**कलम २४ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

४८. एखाद्या निरीक्षकाने किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये निरीक्षकाच्या शक्तींचा वापर करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने, कोणतेही वजन किंवा माप अथवा त्याच्याशी संबंधित कोणतेही दस्तऐवज किंवा इतर अभिलेख हजर करण्यास फर्मावले असताना जो कोणी, वाजवी कारण नसताना तसे करणार नाही किंवा तसे करण्यात कसूर करील त्याला एक हजार रुपयां-पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**कलम २८ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

४९. जो कोणी, एखाद्या निरीक्षकाच्या किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये निरीक्षकाच्या शक्तींचा वापर करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या, कोणतेही वजन किंवा माप किंवा त्याच्याशी संबंधित कोणतेही दस्तऐवज किंवा इतर अभिलेख किंवा कोणत्याही पाकीटबंद वस्तू-मधील निव्वळ वस्तू यांचे निरीक्षण व पडताळणी करण्यासाठी अथवा अन्य कोणत्याही विहित प्रयोजना-साठी कोणत्याही जागेतील प्रवेशात अडथळा आणील त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल.

**कलम २९ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

५०. जो कोणी, नियंत्रकास किंवा नियंत्रकाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधि-काऱ्यास कोणत्याही जागेची झडती घेण्यास प्रतिबंध करील किंवा कोणत्याही निरीक्षकाला कोणतेही वजन, माप, पाकीटबंद वस्तू, माल, दस्तऐवज, अभिलेख किंवा लेबल याची कोणतीही जप्ती करण्यास प्रतिबंध करील त्याला, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**कलम ३० व ३१ यांच्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

**कलम ३३ च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

५१. (१) जो कोणी, पाकीटबंद स्वरूपातील कोणतीही वस्तू निर्माण करील, वितरित करील, पाकीटबंद करील, विकील अथवा विक्रीसाठी ठेवील अथवा विक्रीसाठी देऊ करील वा मांडील किंवा विक्रीसाठी आपल्या कब्जात ठेवील आणि असे प्रत्येक पुडके, मानक अधिनियमाचे उपबंध आणि त्याखाली केलेले नियम आणि कलम ३३ या अनुरूप नसले तर, त्याला पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

(२) जो कोणी, पाकीटबंद स्वरूपातील कोणतीही वस्तू, अशा पाकिटात असलेली वस्तू त्या पाकिटावर किंवा त्यावरील लेबलवर नमूद केलेले वजन, माप किंवा नग यापेक्षा वजन, माप किंवा, प्रकरणपरत्वे, नग यामध्ये कमी असल्याचे माहीत असून किंवा तसे मानण्यास कारण असताना निर्माण करील, पाकिटात भरील, वितरित करील किंवा विकील अथवा निर्माण करण्याची, पाकिटात भरण्याची, वितरित करण्याची किंवा विकण्याची व्यवस्था करील त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, पाकिटात असलेले परिमाण, त्या पाकिटावर किंवा त्यावरील लेबलावर जाहीर केलेल्या परिमाणापेक्षा कमी आहे किंवा कसे हे निश्चित करताना, अशा पाकिटात असलेल्या वस्तूच्या संबंधात मानक अधिनियमान्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कमाल अनुज्ञेय त्रुटी विचारात घेतली जाईल.

**कलम ३५च्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.**

५२. कलम ३५ च्या उपबंधांचे अनुपालन न करता जो कोणी, कोणत्याही वस्तूची विक्री राशीने करील त्याला एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

**लायसनामध्ये अनधिकृत फिरवा-फिरव करण्याबद्दल शास्ती.**

५३. जो कोणी, नियंत्रकाकडून या बाबतीत प्राधिकृत करण्यात आले असेल त्या खेरीज अन्यथा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये देण्यात आलेल्या किंवा नवीकरण करण्यात आलेल्या लायसनामध्ये फेरबदल करील किंवा अन्यथा अनधिकृत फिरवाफिरव करील त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

**नाकारलेले वजन व माप यांची विक्री किंवा पोचवणी करण्याबद्दल शास्ती.**

५४. जो कोणी, या अधिनियमान्वये किंवा मानक अधिनियमान्वये किंवा उक्त अधिनियमांपकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये पडताळणीनंतर नाकारण्यात आलेले कोणतेही वजन किंवा माप याची विक्री करील, पोचवणी करील किंवा ते निकालात काढील किंवा त्याची विक्री, पोचवणी करण्याची किंवा ते निकालात काढण्याची व्यवस्था करील, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील :

परंतु, विहित रीतीने विरूपित करण्यात आलेल्या कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या भंगाराच्या स्वरूपातील विक्रीला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**पदाधिकारी म्हणून तोतयेगिरीबद्दल शास्ती.**

५५. जो कोणी, कोणत्याही रीतीने, नियंत्रक, अपर नियंत्रक किंवा निरीक्षक किंवा नियंत्रकाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला अन्य कोणताही अधिकारी म्हणून तोतयेगिरी करील त्याला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल.

**खोटी माहिती देण्याबद्दल किंवा खोटे अभिलेख किंवा नोंदवह्या ठेवण्याबद्दल शास्ती.**

५६. (१) जो कोणी, नियंत्रकाला, अपर नियंत्रकाला किंवा निरीक्षकाला किंवा नियंत्रकाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला, आपले कर्तव्य करीत असताना, जी आवश्यक असेल किंवा जी त्याला मागता येईल आणि जी एकतर खोटी असल्याचे त्याला माहीत आहे किंवा जी खोटी आहे असे मानण्यास त्यास कारण आहे किंवा जी खरी आहे असे त्याला वाटत नाही, अशी माहिती त्याला देईल त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.]

(२) जो कोणी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तसे करण्यास फर्मावण्यात आले असता, कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाबाबत जे खोटे असेल असे विवरणपत्र सादर करील अथवा कोणताही खोटा असलेला अभिलेख किंवा नोंदवही ठेवील, त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

५७. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये शक्तींचा वापर करणाऱ्या कोणत्याही निरीक्षकाने किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करून, कोणतेही वजन किंवा माप यांची बुद्धिपुरस्सर पडताळणी केली किंवा त्यावर मुद्रा लावली तर, त्याला, अशा प्रत्येक अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. कायद्याचे व्यतिक्रमण करून बुद्धिपुरस्सर पडताळणी करणे किंवा माहिती उघड करणे.

(२) जर कोणत्याही निरीक्षकाने किंवा अन्य अधिकाऱ्याने आपले कर्तव्य करीत असताना, कोणत्याही जागेत प्रवेश केला असता, अशा कर्तव्याचे पालन करण्यासाठी असेल त्या व्यतिरिक्त, कोणतेही व्यापारी गुपित किंवा कोणत्याही निर्मितिप्रक्रियेच्या संबंधातील कोणतेही गुपित यासंबंधात अशा जागेमधून मिळवलेली कोणतीही माहिती, कोणत्याही व्यक्तीकडे बुद्धिपुरस्सर उघड केली तर, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

५८. ह्या अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश याखालील शक्तींचा वापर करणारा कोणताही निरीक्षक किंवा अन्य कोणताही अधिकारी, असे करण्यास वाजवी कारणे नाहीत हे त्याला माहीत असून देखील, त्रासदायक झडती.

(क) कोणतेही घर, वाहन वा ठिकाण यांची झडती घेईल किंवा झडती घेण्याची व्यवस्था करील, अथवा

(ख) कोणत्याही व्यक्तीची झडती घेईल, अथवा

(ग) कोणतेही वजन, माप वा इतर जंगम मालमत्ता जप्त करील,

तर, त्याला, अशा प्रत्येक अपराधासाठी, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

५९. जो कोणी, या अधिनियमामध्ये ज्या व्यतिक्रमणांसाठी स्वतंत्रपणे शिक्षेचा उपबंध करण्यात आलेला नाही अशा या अधिनियमांच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील त्याला दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल. ज्यांच्यासाठी स्वतंत्रपणे उपबंध केलेला नाही अशा व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.

६०. (१) जर कोणतीही व्यक्ती,— विवक्षित प्रकरणांमध्ये गृहीत धरावयाच्या गोष्टी.

(क) कोणतेही खोटे वजन किंवा माप बनवील किंवा त्याची निर्मिती करील अथवा बनवण्याची किंवा निर्मिती करण्याची व्यवस्था करील, किंवा

(ख) कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी वा संरक्षणासाठी कोणतेही खोटे किंवा पडताळणी न केलेले वजन किंवा माप उपयोगात आणील किंवा त्याचा उपयोग केला जाण्याची व्यवस्था करील, किंवा

(ग) कोणतेही खोटे किंवा पडताळणी न केलेले वजन किंवा माप विकील, त्याचे वितरण करील किंवा त्याची पोचवणी करील किंवा त्याचे अन्यथा हस्तांतरण करील किंवा त्याची विक्री, वितरण, पोचवणी किंवा अन्यथा हस्तांतरण करण्याची व्यवस्था करील;

तर, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत असे गृहीत धरले जाईल की, ते वजन किंवा माप हे खोटे किंवा पडताळणी न केलेले वजन किंवा, प्रकरणपरत्वे माप आहे हे माहीत असताना तिने तसे केले आहे.

(२) जर कोणतेही खोटे किंवा पडताळणी न केलेले वजन किंवा माप, कोणत्याही संव्यवहारात, औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी उपयोगात आणले जाण्याची शक्यता ज्यावरून दिसत असेल अशा परिस्थितीत, कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असेल तर, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत असे गृहीत धरले जाईल की, असे खोटे किंवा पडताळणी न केलेले वजन किंवा माप कोणत्याही संव्यवहारात किंवा औद्योगिक उत्पादनासाठी किंवा संरक्षणासाठी उपयोगात आणण्याच्या हेतूनेच अशा व्यक्तीकडून ते तिच्या कब्जात ठेवण्यात, धारण करण्यात किंवा नियंत्रणाखाली ठेवण्यात आले आहे.

नियोक्त्याने अपराधास असतांना, अपप्रेरणा दिली असे केव्हा मानता येईल.

६१ (१) कोणत्याही नियोक्त्यास, त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, अशा नियुक्तीवर असतांना, या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले आहे हे माहीत असेल किंवा तसे मानण्यास त्याच्याकडे कारण असेल तेव्हा त्याने या अधिनियमाविरुद्ध अपराधास अपप्रेरणा दिली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, अशा नियोक्त्याला ज्या दिनांकास,—

(क) अशा व्यतिक्रमणाबद्दल कळले असेल, अथवा

(ख) असे व्यतिक्रमण घडले आहे असे मानण्यास कारण असेल,

त्या दिनांकापासून सात दिवसांचा कालावधी संपण्यापूर्वी, जर त्याने नियंत्रकाला जिच्याकडून असे व्यतिक्रमण घडले असेल त्या व्यक्तीचे नांव आणि अशा व्यतिक्रमणाचा दिनांक व तपशील लेखी कळविला असेल तर, अशी कोणतीही अपप्रेरणा दिली नाही असे समजण्यात येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाविरुद्ध अपराधास अपप्रेरणा दिली असल्याचे समजण्यात आले असेल तिला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्हीही शिक्षा दिल्या जातील आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**स्पष्टीकरण.**—पोटकलम (१) च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर, एखाद्या कर्मचाऱ्याला बडतर्फ करण्यात आले किंवा त्याची सेवा समाप्त करण्यात आली तरी त्यामुळे कोणताही नियोक्ता, या पोटकलमाखालील त्याच्या दायित्वातून मुक्त होणार नाही.

कंपन्यांनी केलेले अपराध.

६२. (१) जर या अधिनियमाखालील अपराध करणारी व्यक्ती म्हणजे एखादी कंपनी असेल तर, अपराध घडला त्यावेळी जो जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज चालनाबद्दल तिची प्रभारी होती किंवा तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास त्या पात्र असतील :

परंतु, त्या व्यक्तीने अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण शक्य तेवढी वाजवी तत्परता दाखवली होती असे जर सिद्ध केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील कोणताही अपराध कंपनीने केलेला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो करण्यात आला होता अथवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे आणि त्यामध्ये पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे, आणि

(ख) पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

अपराधाची दखल.

६३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

[१][(क) पुढील व्यक्तींनी लेखी तक्रार नोंदल्याशिवाय, कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधांची दखल घेणार नाही :—

(एक) नियंत्रक;

(दोन) नियंत्रकाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकृत केलेला कोणताही अन्य अधिकारी;

(तीन) कोणतीही व्यथित व्यक्ती; किंवा

(चार) एखादा मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघ—मग ती व्यथित व्यक्ती अशा अधिसंघाची सदस्य असो अथवा नसो.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघ" याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कायद्यान्वये नोंदणीकृत एखादा स्वयंसेवी उपभोक्ता अधिसंघ, असा आहे.]

---

१. १९८६ चा विशोधन अधिनियम क्र. ७२ याच्या कलम ५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ जुलै १९८७ रोजी व तेव्हापासून)

(ख) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

**विवक्षित अपराधांची संक्षिप्त संपरीक्षा.**

६४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३६, कलम ३८, कलम ३९, कलम ४०, कलम ४१, कलम ४२, कलम ४५, कलम ५१, कलम ५२ किंवा कलम ७२ चे पोटकलम (३) अन्वये शिक्षापात्र अपराधाची संक्षिप्त संपरीक्षा करता येईल.

**अपराध आपसात मिटवणे.**

६५. (१) कलम ३९, कलम ४०, कलम ४१, कलम ४२, कलम ४४, कलम ४५, कलम ४६, कलम ४७ कलम ४८, कलम ५१, कलम ५२, कलम ५४ किंवा कलम ५९, अथवा कलम ७२ चे पोटकलम (३) या अन्वये केलेला कोणताही नियम, याखालील कोणताही शिक्षापात्र अपराध, खटला दाखल करण्यापूर्वी किंवा केल्यानंतर, नियंत्रक किंवा नियंत्रकाकडून यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेला अन्य कोणताही अधिकारी यांच्याकडून, नियंत्रक किंवा असा अन्य अधिकारी विनिर्दिष्ट करील अशी रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्यासाठी भरण्यात आल्यानंतर, आपसात मिटवता येईल :

परंतु, अशी रक्कम ही, कोणत्याही परिस्थितीत, अशा तऱ्हेने आपसात मिटविलेल्या अपराधाबद्दल या अधिनियमान्वये लादता येईल अशा द्रव्यदंडाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीकडून घडलेला पहिला अपराध आपसात मिटविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत तोच किंवा तसाच अपराध करणाऱ्या त्या व्यक्तीला पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण :**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, अपराध आपसात मिटविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर केलेला कोणताही दुसरा किंवा नंतरचा अपराध हा पहिला असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणताही अपराध पोटकलम (१) अन्वये आपसात मिटविण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा तऱ्हेने आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधासंबंधात अपराधी व्यक्तीच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही किंवा, प्रकरणपरत्वे, पुढील कार्यवाही केली जाणार नाही आणि अपराधी व्यक्ती अभिरक्षेत असल्यास तिला तात्काळ मुक्त करण्यात येईल.

(४) या अधिनियमाखालील कोणताही शिक्षापात्र अपराध, या कलमाद्वारे उपबंधित केल्यानुसार असेल ते खेरीज करून, आपसात मिटविला जाणार नाही.

**भारतीय दंड संहितेचे उपबंध, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधास लागू नसणे.**

६६. भारतीय दंड संहितेचे (१८६० चा ४५) उपबंध हे वजन किंवा माप यांच्या बाबतीतील अपराधांशी संबंधित असतील तेथवर, या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधास लागू होणार नाहीत.

## प्रकरण बारा

### संकीर्ण

**व्यवसायाचे हस्तांतरण किंवा प्रेषण.**

६७. (१) ज्यावेळी या अधिनियमाद्वारे लायसन देण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीचा व्यवसाय हा विनामृत्युपत्र वा मृत्युपत्रीय उत्तराधिकाराद्वारे प्रेषित होतो, त्यावेळी तशा व्यक्तीचा वारस किंवा प्रकरणपरत्वे, उत्तरदानग्राही, अशा लायसनधारकाचा व्यवसाय, अशा प्रेषणाच्या दिनांकानंतर साठ दिवसांचा कालावधी संपण्यापूर्वी त्या वारसाने किंवा उत्तरदानग्राहीने, या अधिनियमाच्या उपबंधानुसार लायसन देण्यासाठी नियंत्रकाकडे अर्ज केलेला असेल त्याशिवाय, स्वतःच्या किंवा अन्य कोणत्याही नावाने चालवणार नाही :

परंतु, असा लायसनधारक म्हणून उपरोक्त साठ दिवसांच्या कालावधीत आणि त्याने अशा लायसनसाठी अर्ज केला असल्यास, त्याला लायसन दिले जाईपर्यंत किंवा असे लायसन त्याला देता येणार नाही असे नियंत्रकाकडून त्याला लेखी सूचनेद्वारे कळविले जाईपर्यंत, व्यवसाय चालवण्यास, वारसाला किंवा उत्तरदानग्राहीला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होत असल्याचे मानले जाणार नाही.

(२) ज्यावेळी या अधिनियमान्वये लायसन देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा व्यवसाय, विक्री, देणगी, भाडेपट्टा यापुढे किंवा अन्यथा हस्तांतरित झाला असेल त्यावेळी हस्तांतरिती किंवा प्रकरणपरत्वे, पट्टेदार, तसा व्यवसाय चालू ठेवण्यास लायसन मिळवले असल्याशिवाय, तो असा व्यवसाय स्वतःच्या किंवा अन्य कोणत्याही नावे चालू ठेवणार नाही.

**लायसने विक्रीयोग्य किंवा हस्तांतरणीय नसणे.**

६८. या अधिनियमान्वये देण्यात आलेले किंवा नवीकरण करण्यात आलेले लायसन विक्रीयोग्य किंवा अन्यथा हस्तांतरणीय असणार नाही.

**अपिले.**

६९. (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने—

(क) या अधिनियमाच्या प्रकरण पाच, प्रकरण सहा, प्रकरण सात, प्रकरण आठ, प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहा अन्वये,—

(एक) एखाद्या निरीक्षकाकडून, किंवा

(दोन) एखाद्या अतिरिक्त नियंत्रकाकडून

देण्यात आलेल्या प्रत्येक निर्णयावर किंवा केलेल्या आदेशावर [नियंत्रकाकडे, आणि]

(ख) या अधिनियमाच्या प्रकरण पाच, प्रकरण सहा, प्रकरण सात, प्रकरण आठ, प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहा अन्वये नियंत्रकाकडून देण्यात आलेल्या खंड (क) खालील अपिलावर दिलेला निर्णय नसलेल्या, प्रत्येक निर्णयावर किंवा करण्यात आलेल्या आदेशावर, राज्य शासनाकडे किंवा या संबंधात त्या शासनाने विशेषकरून प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे

अपील करता येईल.

(२) असे प्रत्येक अपील, ज्याच्या विरुद्ध अपील करण्यात आले असेल असा प्रत्येक निर्णय किंवा आदेश याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दाखल केले जाईल :

परंतु, उक्त साठ दिवसांच्या कालावधीच्या आत अपील दाखल करण्यात अपीलकर्त्याला पुरेशा कारणावरून प्रतिबंध झाला होता अशी अपिलीय प्राधिकरणाची खात्री पटली तर, ते अपीलकर्त्याला पुढील साठ दिवसांच्या कालावधीच्या आत अपील दाखल करण्यास परवानगी देऊ शकेल.

(३) असे कोणतेही अपील मिळाल्यावर अपील प्राधिकरण, अपिलातील पक्षकारांना आपापली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो निर्णय किंवा आदेश, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे कायम करणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा तो फिरवणारा त्याला योग्य वाटेल असा निर्णय देईल किंवा आवश्यक असल्यास अतिरिक्त पुरावा घेऊन, नव्याने निर्णय घेण्यासाठी किंवा आदेश देण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशा निदेशासह, प्रकरण परत पाठवू शकेल.

(४) प्रत्येक अपील, विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर दाखल करण्यात येईल.

(५) ज्यामध्ये कोणताही निर्णय किंवा आदेश देण्यात आला आहे अशा कोणत्याही कार्यवाहीचा (अपिलातील कार्यवाही धरून) अभिलेख, राज्य शासनाला, स्वप्रेरणेने किंवा अन्यथा, अशा निर्णयाचा किंवा आदेशाचा अचूकपणा, वैधता किंवा औचित्य याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, मागविता येईल व त्याची तपासणी करता येईल आणि त्याला त्यावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील :

परंतु, प्रस्तावित कार्यवाहीविरुद्ध कारण दाखविण्याची वाजवी संधी कोणत्याही व्यक्तीला दिल्याशिवाय, या पोट कलमान्वये कोणत्याही निर्णयात वा आदेशात अशा व्यक्तीवर बाधक परिणाम होईल असा बदल केला जाणार नाही.

**फी ची आकारणी.**

७०. राज्य शासनाला, कलम ७२ अन्वये केलेल्या नियमांद्वारे, खालीलप्रमाणे जास्तीत जास्त फी आकारता येईल :—

(क) कोणतेही वजन किंवा माप बनवणे किंवा निर्माण करणे यासाठी लायसन देणे किंवा त्यांचे नवीकरण करणे यांच्या अर्जासाठी पाचशे रुपये.

(ख) कोणतेही वजन किंवा माप दुरुस्त करणे किंवा विकणे यासाठी लायसन देण्याकरिता शंभर रुपये.

(ग) कोणत्याही लायसनमध्ये फेरबदल करण्यासाठी पन्नास रुपये.

(घ) कोणतेही वजन किंवा माप यांच्या पडताळणीसाठी, अशी पडताळणी करण्यात अंतर्भूत असणारा वेळ व श्रम लक्षात घेऊन, श्रेणीबद्ध प्रमाणानुसार पाच हजार रुपये.

(ङ) कोणतेही वजन किंवा माप यांच्या समायोजनासाठी दहा रुपये.

(च) लायसनची दुसरी प्रत किंवा पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी दहा रुपये.

(छ) गोपनीय स्वरूपाचा नसेल अशा कोणत्याही दस्तऐवजाच्या प्रती देण्यासाठी प्रत्येक शंभर किंवा त्यापेक्षा कमी शब्दांसाठी एक रुपया.

(ज) या अधिनियमान्वये दाखल केलेल्या कोणत्याही अपिलासाठी पंचवीस रुपये.

(झ) कलम १७ अन्वये नोंदणीच्या किंवा नोंदणीच्या नवीकरणासाठीच्या अर्जाकरिता पाच रुपये.

७१. (१) राज्य शासनाला, अधिसूचनेद्वारे निदेश देता येईल की, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही बाबींच्या संबंधातील आणि अशा शर्तींच्या अधीनतेने, कलम ६९ (अपिलासंबंधीची) किंवा कलम ७० (फी चे प्रमाण ठरवून देण्याची शक्ती) किंवा कलम ७२ (नियम करण्याची शक्ती) याअन्वये प्रदान करण्यात आलेली शक्ती नसेल अशी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये वापरण्यायोग्य अशी कोणतीही शक्ती, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याला दुय्यम असलेल्या अधिकाऱ्यालाही वापरता येईल. शक्तीचे प्रत्यायोजन.

(२) राज्य शासनाने लादलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशाच्या किंवा शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही शक्तींचा वापर करण्यास, राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, त्या शक्ती जणू काही या अधिनियमान्वयेच त्या व्यक्तीला, प्रत्यायोजनाद्वारे नव्हे तर प्रत्यक्ष प्रदान करण्यात आल्या असल्याप्रमाणे त्याच पद्धतीने आणि त्या मर्यादेपर्यंत, वापरता येतील.

७२. (१) राज्य शासनाला, अधिसूचनेद्वारे आणि केंद्र शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर, या अधिनियमाचे उपबंध पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे खालीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील त्या बाबी अशा,—

(क) कलम १० द्वारे फर्मावण्यात आले असेल असे वजन, माप किंवा नग याद्वारे असेल ते खेरीजकरून, ज्यांच्या संबंधात कोणताही संव्यवहार, व्यवहार, संविदा किंवा औद्योगिक उत्पादन किंवा संरक्षण यासाठी उपयोग केला जाणार नाही किंवा स्वीकारला जाणार नाही, अशा मालाचा, सेवांचा, उपक्रमांचा किंवा उपयोगांचा वर्ग,

(ख) खालील मानके ज्या ठिकाणी आणि ज्या अभिरक्षेत ठेवली जातील ती ठिकाणे व अभिरक्षा, :—

कलम १२ व कलम १४ च्या पोटकलम (५) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे—

(एक) निदेश मानक,

(दोन) दुय्यम मानक,

(तीन) कार्यसाधक मानक,

(ग) कलम १५ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेले वजन किंवा माप ओळखण्याच्या वैशिष्ट्याचे स्वरूप व तपशील,

(घ) कलम १७ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला एखादा अर्ज, ज्या कालावधीच्या आत करता येईल तो कालावधी, अशा अर्जात असावयाचा तपशील, आणि असा अर्ज करण्याचा नमुना व रीत.

(ङ) कलम १७ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेली नोंदवही ज्या नमुन्यात व ज्या रीतीने ठेवण्यात येईल तो नमुना व ती रीत,

(च) कलम १७ च्या पोटकलम (३) अन्वये करावयाचा एखादा अर्ज ज्या नमुन्यात व ज्या रीतीने करण्यात येईल तो नमुना व ती रीत,

(छ) कलम १९ च्या पोटकलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणतेही वजन किंवा माप बनविणारा, त्याचा निर्माता, दुरुस्तीकार किंवा व्यापारी म्हणून धंदा चालविण्यासाठी लायसन देण्याकरिता किंवा त्याचे नवीकरण करण्याकरता ज्या नमुन्यात अर्ज करण्यात येईल तो नमुना ;

(ज) कलम १९ च्या पोटकलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणतेही लायसन ज्या नमुन्यात देता येईल तो नमुना आणि ज्यांच्या अधीनतेने ते देता येईल त्या शर्ती, मर्यादा व बंधने आणि अशा लायसनच्या विधिग्राह्यतेचा कालावधी;

(झ) कलम १९ च्या पोटकलम (७) अन्वये दुरुस्तीकाराने, प्रतिभूती म्हणून प्रस्तुत करावयाची रक्कम;

(ञ) कलम १९ च्या पोटकलम (८) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे उपयोगकर्त्यांना जे नियंत्रकाच्या लेखी परवानगीखेरीज विकता येणार नाही अशा वजनाचे किंवा मापाचे वर्णन;

(ट) कलम २० च्या पोटकलम (५) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे लायसन रद्द करण्यात आल्यानंतर वजन किंवा माप निकालात काढण्याची आणि त्यापासून मिळालेल्या उत्पन्नाचे वितरण करण्याची रीत;

(ठ) वजन व माप यांच्या संबंधात कलम २३ च्या पोटकलम (१) च्या उपबंधांनुसार ठेवावयाचे अभिलेख व नोंदवह्या ;

(ड) कलम २४ च्या पोटकलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे वजन किंवा माप यांची पडताळणी किंवा फेरपडताळणी ज्या कालावधीच्या आत करण्यात येईल तो कालावधी;

(ढ) कलम २४ च्या पोटकलम (३) च्या परंतुकाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याच्या ठिकाणापासून हलवता येणे शक्य नसेल अशा किंवा हलविण्यात येऊ नये अशा कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या पडताळणीसाठी करावयाची उपाययोजना ;

(ण) कलम २४ च्या पोटकलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणत्याही वजनाच्या किंवा मापाच्या पडताळणीचे प्रमाणपत्र ज्या नमुन्यात देण्यात येईल तो नमुना आणि कलम २४ च्या पोटकलम (५) मध्ये निर्देशिलेले प्रमाणपत्र ज्या नमुन्यात देण्यात येईल तो नमुना आणि कलम २४ च्या पोटकलम (६) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अशा प्रमाणपत्रात असावयाचा तपशील ;

(त) जप्त करण्यात आलेला जो माल फार लवकर आणि नैसर्गिक रीत्या कुजणारा असा असेल त्याच्या बाबतीत, कलम ३१ च्या पोटकलम (१) च्या परंतुकाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विल्हेवाटीची पद्धत ;

(थ) या अधिनियमान्वये जप्त करण्यात आलेले, पडताळणी न केलेले एखादे वजन किंवा माप याच्या बाबतीत, कलम ३२ च्या परंतुकाद्वारे ज्या कालावधीच्या आत पडताळणी करून व त्यावर मुद्रा लावून घेण्यास परवानगी देता येईल असा कालावधी;

(द) कलम ३३ च्या पोटकलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ज्या रीतीने व ज्या शर्ती, निर्बंध आणि मर्यादा यांच्या अधीनतेने,—

(एक) राज्यांतर्गत विक्री किंवा वितरण उद्देशित असलेली कोणतीही वस्तू पाकीटबंद करता येईल, किंवा

(दोन) पाकीटबंद स्वरूपात कोणत्याही वस्तूची राज्यांतर्गत विक्री किंवा वितरण करता येईल—

ती रीत आणि त्या शर्ती, निर्बंध व मर्यादा ;

(ध) कलम ५४ च्या परंतुकाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे नाकारलेली वजन किंवा माप यांच्यावरील मुद्रा पुसून टाकण्याची रीत ;

(न) कलम ६९ अन्वये अपिले दाखल करावयाचा नमुना आणि अपिलांच्या सुनावणीची कार्यपद्धती;

(प) कलम ७० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी प्रत्येकीसाठी आकारावयाच्या व गोळा करावयाच्या फी ची रक्कम ;

(फ) विहित करणे आवश्यक असेल किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब ;

(३) या कलमान्वये कोणताही नियम करताना, राज्य शासनाला असे उपबंधित करता येईल की, त्याचा भंग केल्यास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

(४) या कलमान्वये नियम करण्याची शक्ती ही, तो नियम शासकीय राजपत्रात पूर्वप्रकाशित केला जाईल या शर्तीच्या अधीन असेल.

(५) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाची दोन सभागृहे असतील तेथे प्रत्येक सभागृहासमोर आणि राज्य विधानमंडळाचे, एकच सभागृह असेल तेथ त्या सभागृहासमोर मांडला जाईल.

**प्रतिमानांना मान्यता देण्यासंबंधीचे मानक अधिनियमाचे उपबंध केवळ राज्यांतर्गत उपयोग उद्देशित असलेल्या वजनांच्या किंवा मापाच्या प्रतिमानांना लागू करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

७३. (१) लायसनप्राप्त निर्मात्याकडून निर्माण करण्यात आलेले कोणत्याही प्रकारचे वजन किंवा माप ज्यावेळी असे असेल की, त्याने तशा प्रकारे राज्यांतर्गत निर्माण केलेली सर्व वजने किंवा मापे ही तेथेच विकली, वितरित केली किंवा पोचती केली जाणे उद्देशित असेल त्यावेळी, राज्य शासनाला अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, अशा प्रत्येक प्रकारच्या वजनाचे किंवा मापाचे प्रतिमान, मानक अधिनियमाची कलमे ३६, ३७ व ३८ यांच्या उपबंधानुसार मान्यतेसाठी सादर केले जाईल आणि त्यानंतर उक्त कलमे ३६, ३७ व ३८ यांचे उपबंध अशा प्रतिमानाला लागू होतील आणि त्या कलमांतील केंद्र शासनाच्या आणि मानक अधिनियमांच्या निर्देशांचा अर्थ, ते अनुक्रमे राज्य शासनाचे व या अधिनियमाचे निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

(२) ज्यावेळी कोणत्याही प्रकारच्या वजनाच्या किंवा मापाच्या संबंधात, राज्य शासन, पोटकलम (१) अन्वये निदेश देईल त्यावेळी त्या प्रकारच्या वजनाच्या किंवा मापाच्या संबंधात मानक अधिनियमाच्या कलम ३९, कलम ४० किंवा कलम ४१ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण म्हणजे या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध ठरेल आणि मानक अधिनियमामध्ये त्यासाठी उपबंधित केलेली शिक्षा ही, शिक्षणासंबंधीचे उक्त उपबंध हे जणू काही या अधिनियमाद्वारेच अधिनियमित केले असल्याप्रमाणे, त्यासाठी या अधिनियमान्वये उपबंधित केलेली शिक्षा असल्याचे मानण्यात येईल.

७४. या अधिनियमाचे उपबंध, वजन आणि माप यांच्या पडताळणीशी आणि त्यावर मुद्रा लावण्याशी ते संबंधित असतील तेथवर, खालील कोणत्याही वजनाला किंवा मापाला लागू होणार नाहीत,—— विवक्षित प्रकारांना हा अधिनियम लागू न होणे.

(क) संघाच्या सशस्त्र बलांच्या उपयोगासाठी कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा किंवा दोन्ही याचीच केवळ निर्मिती करणाऱ्या कोणत्याही कारखान्यात उपयोगात आणले जाणारे ;

(ख) वैज्ञानिक अन्वेषण किंवा संशोधन यासाठी उपयोगात आणले जाणारे.

७५. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या एखाद्या राज्यातील प्रारंभानंतर, त्या राज्यात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे तत्सम उपबंध निरसित झालेले असतील आणि अशा निरसनानंतर सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याच्या कलम ६ चे अशा तऱ्हेने निरसित झालेले उपबंध हे, एखाद्या केंद्रीय अधिनियमाचे उपबंध असल्याप्रमाणे लागू होतील. निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, अशा कायद्यानुसार केलेली, काढलेली किंवा दिलेली कोणतीही नियुक्ती, अधिसूचना, नियम, आदेश, नोंदणी, लायसन, प्रमाणपत्र, नोटीस, निर्णय, मान्यता, प्राधिकार किंवा संमती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी अंमलात असल्यास, अंमलात असणे चालू राहील आणि जणू काही ती या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली, काढलेली किंवा दिलेली असल्याप्रमाणे परिणामक असेल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई